शेतकरी प्रकाशनः २०

शेतकरी संघटना

आंदोलनापासून स्वतंत्र भारत पक्षापर्यंत

# राजकीय भूमिका

- अजित नरदे

शेतकरी प्रकाशन ॥२०॥

# शेतकरी संघटना :
# राजकीय भूमिका
## आंदोलनापासून स्वतंत्र भारत पक्षापर्यंत

— अजित नरदे
जयसिंगपूर (जि. कोल्हापूर)

प्रकाशन : १२ नोव्हेंबर १९९४

शेतकरी प्रकाशन ॥२०॥

१२ नोव्हेंबर १९९४

**प्रकाशन स्थळ :** कस्तुरचंद पार्क, नागपूर

**शेतकरी संघटना : राजकीय भूमिका**

**SHETKARI SANGHATANA : RAJAKEEYA BHOOMIKA**

**प्रकाशिका :** सौ. सुमित्रा अरविंद कुलकर्णी
शेतकरी प्रकाशन
द्वारा, शेतकरी संघटना, मध्यवर्ती कार्यालय,
अंगारमळा, आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे (महाराष्ट्र)

**अक्षरजुळणी :** गणेश मुद्रा
६९२ बुधवार पेठ,
पुणे ४११ ००२.

**मुद्रक :** गणेश प्रिंटर्स
६९३ बुधवार पेठ,
पुणे ४११ ००२.
दूरध्वनि : ४५११४४, ४५११०९

मूल्य : **रु. दहा मात्र**

# प्रकाशनाच्या निमित्ताने ....

शेतकरी संघटनेची संपूर्ण विचारयात्रा आणि कार्यक्रम हे अगदी सुरुवातीपासूनच, जनसामान्यांच्या नावाने काही ना काही करतो आहोत असं म्हणणारांना सतत 'अनवट'च वाटत आलेले आहेत. चालू कार्यक्रमांवरून पुढील पायरीची अटकळ त्यांना कधीच बांधता आली नाही. परिणामी त्यांच्या जिवाचा त्रागा त्रागा झाला. त्यातूनही निवडणुकीच्या राजकारणाला सरावलेल्या मंडळींना तर शेतकरी संघटनेची राजकीय भूमिका सतत अनाकलनीयच राहिली. शेतकरी संघटनेला सत्तेच्या खुर्चीत काहीही रस नाही, प्रचलित अर्थव्यवस्थेत त्या खुर्चीवर बसलेल्या व्यक्तीच्या हातात खऱ्या अर्थी सत्ता असतच नाही; त्याची स्थिती चालत्या बैलगाडीखालून चालणाऱ्या कुत्र्यासारखी असते असे शेतकरी नेते श्री. शरद जोशी यांनी अगदी सुरुवातीच्या काळातच सांगून ठेवले आहे. याचा अर्थ आम्ही पाच वर्षे आंदोलनं करणार, लाठ्या खाणार, गोळ्या झेलणार, तुरुंगात जाणार आणि निवडणूक आली म्हणजे घरी बसणार, मग राजकारण्यांना काय हैदोस घालायचा असेल तो घालता येईल असे मात्र कुणी मानू नये असा परखड इशाराही त्यांनी दिला होता. निवडणुकीचा वापर शेतकरी आंदोलनाची ताकद वाढविण्यासाठी त्या त्या वेळी परिस्थितीनुरूप राजकीय भूमिका घेऊन केला जाईल असे ठरवून त्यासाठी निवडणुकीवर संपूर्ण बहिष्कारापासून ते स्वतःचे उमेदवार उभे करणे येथपर्यंतचे सर्व पर्याय शेतकरी संघटनेने आपल्या पहिल्या अधिवेशनातच स्वतःसाठी खुले ठेवले.

शेतकरी संघटनेची निवडणूक भूमिका जाहीर होण्याच्या प्रत्येक वेळी, शरद जोशींच्या 'मी स्वतःसाठी मत मागायला आलो तर मला जोड्याने मारा' या प्रथमपुरुषी एकवचनी विधानाचे शेपूट धरून, आयुष्यभर आलटून पालटून अनेकांचे जोडे पुसण्याचेच व्रत निष्ठेने आचरलेल्या अनेक राजकारण्यांनी शरद जोशींवर आणि शेतकरी संघटनेवर टीकेची झोड उठवून शेतकऱ्यांचे लक्ष शेतकरी संघटनेवरून

विचलित करण्याचे प्रयत्न केले.

शेतकरी संघटनेने गेल्या पंधरा वर्षात जेव्हा जेव्हा निवडणुका झाल्या त्या त्या वेळी प्रसंगानुरूप आपली राजकीय भूमिका निश्चित केली आणि निश्चितच शेतकरी आंदोलन अधिकाधिक प्रबळ होत गेले. या प्रबळतेचा प्रत्यय १२ नोव्हेंबर १९९४ रोजी नागपूर येथे होणाऱ्या शेतकरी संघटनेच्या सहाव्या अधिवेशनाचे वेळी येईलच.

सध्या खुल्या अर्थव्यवस्थेच्या संदर्भात शेतकऱ्यांच्या, उद्योजकांच्या आणि पर्यायाने देशाच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी शेतकरी संघटना एका नव्या राजकीय पर्यायाच्या शोधात आहे. प्रचलित सर्व राजकीय प्रणाली कालबाह्य झाल्या असून त्या खुल्या व्यवस्थेच्या दुष्मन आहेत. नव्या पर्यायाचा शोध शेतकरी संघटना येत्या अधिवेशनात घेणार आहे.

या निमित्ताने शेतकरी संघटनेचे एक अभ्यासू कार्यकर्ते श्री. अजित नरदे यांनी शेतकरी संघटनेच्या गेल्या पंधरा वर्षांतील राजकीय भूमिकेचा रेखलेला हा आलेख शेतकरी, उद्योजक, विचारवंत, अभ्यासक यांच्या हाती देतांना 'शेतकरी प्रकाशना'ला आनंद होत आहे. या आलेखासोबतच शेतकरी संघटनेच्या अधिवेशनांतील, कार्यकारिणीच्या काही बैठकांतील राजकीय भूमिकेसंबंधी ठरावांतील उतारे परिशिष्ठ म्हणून दिले आहेत.

शेतकरी संघटनेच्या राजकीय भूमिकेसंबंधीचे मळभ दूर करण्यास ही पुस्तिका उपयुक्त ठरेल असा विश्वास आहे.

१३ ऑक्टोबर १९९४

**सुरेशचंद्र म्हात्रे**
शेतकरी प्रकाशनाच्या वतीने



# शेतकरी संघटना आंदोलनापासून स्वतंत्र भारत पक्षापर्यंत

**— अजित नरदे**

शेतकरी संघटनेच्या राजकीय भूमिकेमुळे दुखावलेली मंडळी शेतकरी संघटना, आता राजकारणात कशी असा प्रश्न विचारताना दिसतात. सत्तेच्या राजकारणापासून शेतकरी संघटना अलिप्त राहील अशी ग्वाही शेतकरी संघटनेच्या नेत्यांनी अनेक वेळा दिली असल्याने अनेकांना हा प्रश्नही रास्त वाटू लागतो. म्हणून शेतकरी संघटनेच्या राजकीय भूमिकेचे आंदोलनातील नेमके स्थान समजावून घेणे आवश्यक आहे.

सर्वसाधारण, १९७८ सालात चाकणच्या कांदा उत्पादक परिसरात शेतकरी संघटनेच्या कामाला सुरुवात झाली. त्यावेळी देशात जनता पक्षाचे राज्य होते. दीर्घकालीन काँग्रेस पक्षाच्या राजवटीला कंटाळलेल्या जनतेने आणिबाणीतील कथित अत्याचार आणि निर्बंधांचा निषेध म्हणून जनता पक्षाला निवडून दिले. पहिले विरोधी पक्षाचे सरकार सत्तेवर आल्याने साहजिक लोकांच्या अपेक्षा वाढलेल्या होत्या. मात्र देश स्वतंत्र होताच काँग्रेस आणि जनता पक्षाच्या शेतीविषयक धोरणात फार मोठा फरक असा नव्हताच.

देश स्वतंत्र होताच पंडीत नेहरूंच्या नेतृत्वाखाली नियोजन-आधारित समाजवादी अर्थव्यवस्थेचा पाया घातला गेला. कारखानदारीच्या विकासानेच देशाची भरभराट होणार, हे निश्चित झाले. कारखानदारीच्या विकासासाठी त्याला लागणारा कच्चा माल व मजूर स्वस्त मिळाले तरच भारतीय कारखानदारी विदेशी कारखानदारीशी स्पर्धा करून वाढेल; त्यासाठी शेतीमालाच्या किंमती कमी पातळीवर राहणे आवश्यक ठरले. शेतीमालाच्या किंमती कमी पातळीवर स्थिर राहाव्यात यासाठी शेतीमालाचे उत्पादन, प्रक्रिया, विक्री आणि निर्यात यांवर विविध बंधने आली. देशाच्या विकासासाठी हेच योग्य आहे, असे मानले गेले. याला विरोध करणाऱ्यांना श्रीमंत शेतकरी, जमीनदार, बागायतदार, मोठे शेतकरी इत्यादींचे हस्तक म्हणून हिणवले जाऊ लागले. एखाद्या गावातील

गुन्हेगारीची प्रकरणे शेतकऱ्यांची अत्याचाराची उदाहरणे म्हणून प्रसिद्धीस येऊ लागली; साहित्य, चित्रपट इत्यादींमधून हेच ग्रामीण वास्तव म्हणून सर्वत्र मांडले जाऊ लागले.

काँग्रेस पक्ष सत्तेवर असताना विरोधी पक्षांचीही, जीवनावश्यक वस्तूंच्या म्हणजेच शेतीमालाच्याच किंमती फारच वाढताहेत अशीच तक्रार होती. म्हणून ते शेतीमालाच्या भाववाढीविरुद्ध मोर्चे आंदोलने करीत. असे विरोधी पक्ष सत्तेवर आल्यानंतर त्यांचेकडून फार वेगळ्या भूमिकेची अपेक्षा नव्हतीच. जनता पक्षाचे राज्य सत्तेवर आल्यानंतर नेहरूवाद्यांनीही शरमिंदे व्हावे अशी शेतकरीविरोधी धोरणे घेतली गेली. साखरेचे उत्पादन त्या काळात भरपूर झाल्याने साखरेची विक्री जनता शासनाने खुली केली. साखरेचे दर प्रती किलोस २ रुपयापर्यंत कोसळले. परिणामी ऊसशेतकरी संपला. उत्तर प्रदेशांत अनेक शेतकऱ्यांनी आपले उसाचे फड जाळून रान मोकळे केले. दुसऱ्या बाजूला शासनाने धान्यांच्या किंमतीही नियंत्रित करून दर पाडले. यावर मलम म्हणून खतांवर अनुदानाची भीक दिली गेली. जनता पक्षाचे नेते, आपण शेतीमालाच्या किंमती कशा कमी केल्या याची प्रौढी मारू लागले. याच काळात फेब्रुवारी १९८० मध्ये भाज्यांचे दर वाढले म्हणून मुंबईतील काही समाजवादी बायांनी तक्रारी केल्याबरोबर सर्व भाजीपाल्याच्या निर्यातीला बंदी घालण्याचा निर्णय सरकारने घेतला. यामुळे कांदा व भाजीपाल्याचे भाव गडगडले. या वेळी कांद्याच्या भावासाठी शेतकऱ्यांना आंदोलन करावे लागले.

जनता पक्षाच्या राजवटीमध्ये शेतकरी आंदोलनाची सुरुवात झाली. नंतर काँग्रेसची राजवट आली. या सर्व काळात शेतीमालाच्या किंमती वाढल्या पाहिजे असे कोणाला वाटत नव्हतेच. उलट, या किंमती पाडण्यातच सर्व राजकीय पक्षांना सार्थक वाटत होते. जीवनावश्यक वस्तूंच्या म्हणजेच शेतीमालाच्या किंमती कमी झाल्या पाहिजे यासाठी सर्व पक्ष आंदोलने करायचे. अशा वातावरणात चाकण परिसरात शेतकरी संघटनेचा जन्म झाला. शेतीमालाच्या किंमती पाडल्यामुळे शेतकरी बरबाद झाला आहे, शेतीमालाला रास्त भाव मिळालाच पाहिजे अशा मागणीमुळे शेतकरी वर्गात नवे चैतन्य निर्माण झाले. शेतकरी आंदोलन गावोगाव पसरू लागले.



चाकणच्या कांद्याचे आंदोलन नाशिक जिल्ह्यात पसरले. पाठोपाठ उसाच्या आंदोलनानंतर आंदोलन संबंध महाराष्ट्रात पसरू लागले. शेतकरी आंदोलनाची वाढती ताकद पाहून सर्व राजकीय पक्षाचे नेते आपल्याच पक्षाला याचा फायदा कसा मिळेल असा प्रयत्न करू लागले. कालपर्यंत महागाईविरूद्ध मोर्चे काढणारे पक्ष शेतीमालाच्या रास्त भावासाठी शेतकरी दिंडी काढू लागले. ग्रामीण भागातील सर्व राजकीय पक्षाचे कार्यकर्ते शेतकरी संघटनेकडे आकर्षित होऊ लागले.

ग्रामीण भागातील तरूण शेतकरी आंदोलनात येऊ लागला. खेड्यापाड्यातील सर्व राजकीय पक्षाचे कार्यकर्तेही तसे शेतकरीच. तेही संघटनेकडे आकर्षित होऊ लागले. शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या केलेल्या मांडणीमुळे सर्वच स्तिमित झालेले. राजकीय मतभेद विसरून सर्व शेतकरी एक होऊ लागला. काँग्रेस पक्ष सत्तेवर असला तरी काँग्रेसचे कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले; विरोधी पक्षाचे कार्यकर्ते– तर झालेच. शेतकरी आंदोलनाची सुरुवात करताना वेगवेगळ्या पक्षांत विभागलेल्या, असंघटित शेतकऱ्यांना एक करताना राजकीय सत्तास्पर्धेपासून दूर ठेवणे अत्यंत आवश्यक होते. सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांनी सत्तेवर असताना शेतकऱ्यांचे गळेच कापले होते. त्यामुळे शेतकरी संघटनेने सर्व राजकीय पक्ष हे चोर आहेत, त्यांच्या धोरणात कांही फरक नाही, हे स्पष्ट केले. शेतकऱ्यांचा विश्वासघात करणाऱ्या राजकीय पक्षांपासून आणि त्यांच्या सत्तास्पर्धेपासून शेतकरी आंदोलन दूर ठेवण्याचा निर्णय शेतकरी संघटनेने जाणीवपूर्वक घेतला.

आपणास राजकीय फायदा मिळत नाही, असे दिसल्यानंतर सर्व विरोधी पक्षांनी (पुलोद आघाडीने) शेतकरी दिंडी काढली. या काळातील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची भूमिका पाहाण्यासारखी आहे. १९८२ मध्ये विजयवाडा येथील अकराव्या काँग्रेसमधील ठरावात शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे (पान ४७). ती अशी होती.

> शेतकऱ्यांच्यावर अन्याय वगैरे झाला हे खरे नाही. उलट "जमीनदारांच्या शक्तीमान फळीने सरकारच्या शेतीविषयक विकास कार्यक्रमाचा चांगला

फायदा मिळवला होता.'' उलट करांच्या बोजाचा हिस्सा वाटून घेण्याला त्यांनी विरोध केला होता. त्यांचेवर संपत्ती आणि आयकर लादण्याला विरोध केला होता आणि अनेक वेळा विजेचे पैसे देण्याचे किंवा कर्जे फेडण्याचेही नाकारले होते.'' म्हणजे शेतकऱ्यांनीच इतरांवर अन्याय केला.

शेतकरी आंदोलनासंबंधी या पक्षाचे मत असे होते. १९८०-८१ साली आर्थिक परिस्थिती बिघडल्याने इंदिरा काँग्रेस सरकारला तेल, खते आणि शेतीधंद्याला लागणाऱ्या इतर वस्तूंच्या किंमती वाढवणे भाग पडले आणि त्याचा या नफेखाऊ महाभागांवर परिणाम झाला.'' म्हणजे १९८० पर्यंतचा शेतकरीवर्ग हा 'नफेखाऊ महाभाग' असल्याचे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे मत होते.

वास्तविक शेतकऱ्यांच्या संबंधी अशी मते असलेल्या पक्षाने शेतकरी आंदोलनाला विरोध करणे आवश्यक होते. पण तसे न करता अशा आंदोलनात भाग घेण्याचा दुटप्पीपण मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने केला. याचे वर्णन विजयवाडा येथील ठरावात कसे आहे पहा.

> "तामिळनाडू आणि कर्नाटकमध्ये (शेतकरी लढ्याचे) पुढारीपण जमीनदारांपाशी होते तर आंध्र, पंजाबमध्ये ते अनेक राजकीय पक्षांचे सहकार्य लाभलेल्या डाव्या शक्तींपाशी होते. महाराष्ट्रातील आंदोलन जमीनदारांनी सुरू केले असले तरी सहा पक्षांच्या नेत्यांनी नंतर त्यात पुढाकार घेतला आणि त्याचे पर्यवसान प्रदीर्घ मोर्च्यामध्ये झाले. कर्नाटकमध्ये या महाभागांनी लढा मागे घेतल्यावरही भा. क. पक्ष (मा.) ने तो चालू ठेवला.''

म्हणजे स्वतंत्र शेतकरी आंदोलन त्यांना जमीनदारांचे आंदोलन वाटते, शेतकऱ्यांच्या कोणत्याही मागण्या रास्त वाटत नाहीत, उलट



शेतकरी नफेखोर महाभाग आहेत असे वाटते. इतकेच नव्हे तर हे नफेखोर महाभाग सरकारची रास्त देणीही देण्यास तयार नाहीत, असे ज्या पक्षाचे मत आहे त्या पक्षानेही शेतकरी आंदोलनात भाग घ्यावा हे त्यांच्या वैचारिक दिवाळखोरीचे प्रतिक मानावे लागेल. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची भूमिका सर्वसाधारण सर्वच डाव्या पक्षांच्या त्या वेळच्या संधीसाधू भूमिकेशी मिळती जुळती आहे.

ज्यावेळी जनता पक्षात असलेले समाजवादी शेतकरी आंदोलनाला पाठिंबा देत होते त्याच वेळी समाजवाद्यांच्या अधिकृत शेतकरी आघाडीचे नेते बा. न. राजहंस याला विरोध करणारे विचार लिहित होते. भाजपच्या आर्थिक भूमिकेसंबंधी फारशी स्पष्टता कधी नव्हतीच. शरद पवार सत्तेसाठी पक्ष सोडून विरोधात आले होते. या सर्व विरोधी पक्षांची मंडळी एका बाजूला शेतकरी आंदोलनाला राजकीय स्वार्थासाठी पाठिंबा देण्याचे नाटक तर करीतच होते पण त्याच वेळी शहरात जाऊन आमच्या राजवटीत आम्ही महागाई (म्हणजे शेतीमालाच्या किंमती) कशा कमी केल्या, याची प्रौढीही मारत होते. अशा विरोधी पक्षांनी शेतकरी दिंडी काढली म्हणून त्याचा शेतकरी आंदोलनावर कोणताच परिणाम झाला नाही. शेतकरी आंदोलन आपल्या दिशेने जातच राहिले.

निपाणी परिसरातील तंबाखूचे आंदोलन, पिंपळगाव बसवंत येथील मेळावा, १० नाव्हेंबर ८१ रोजी झालेले एक दिवसाचे अभूतपूर्व रास्ता रोको आंदोलन अशा रीतीने शेतकरी आंदोलनाचा प्रवास सुरू होता. राज्यकर्त्या पक्षाने आंदोलन कोणत्याही परिस्थितीत दडपून टाकण्याचा निर्धारच केला. तर, विरोधी पक्षांना राजकीय लाभ मिळणार नाही असे दिसताच ते शेतकरी आंदोलनाची ताकद खच्ची करण्याच्या कामी लागले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत झालेल्या या आंदोलनात अनेक शेतकऱ्यांना हौतात्म्य स्वीकारावे लागले तर हजारोंना लाठीमार आणि तुरूंगवास सोसावे लागले. संघर्षामुळे क्लेश आणि बलिदानाची किंमत देत, कधी यश, कधी अपयश पदरी घेऊनही, शेतकरी आंदोलन वाढतच राहिले.

शेतकरी आंदोलनाच्या वाटचालीचा आढावा घेऊन पुढील दिशा ठरवण्यासाठी जानेवारी १९८२ मध्ये शेतकरी संघटनेचे पहिले अधिवेशन सटाण्याला झाले. शेतकरी संघटनेच्या राजकीय भूमिकेसंबंधी सविस्तर

चर्चा करून या अधिवेशनात निर्णय घेतले गेले. शेतकरी संघटनेला राजकीय सत्तास्पर्धेत रस नसला तरी, प्रचलित सर्व राजकीय पक्ष हे शेतकऱ्यांच्या विरोधी असले तरी, शेतकरी संघटनेने निवडणुकीत काय करावे याबद्दलचा निर्णय राखून ठेवला. शेतकऱ्यांच्या मनात असलेल्या असंतोषाचा निवडणुकीवर परिणाम होत नाही असे झाले तर त्याचा फायदा राजकीय पक्षच उचलतील. म्हणून प्रत्येक निवडणुकीच्या वेळी असलेली परिस्थिती लक्षात घेऊन शेतकरी आंदोलनाची ताकद वाढवण्यासाठी शेतकरी संघटनेचे निवडणुकीतील धोरण ठरवण्याचा अधिकार जाणीवपूर्वक राखून ठेवला. शेतकरी संघटना राजकारणात येणार नव्हती मग आता का आली? असा प्रश्न विचारणाऱ्यांनी जानेवारी १९८२ मधील सटाणा अधिवेशनातील ठराव अवश्य वाचून पहावे.

इतिहासात ज्या काळापासून शेतीत वरकड उत्पादन होवून बचत तयार होऊ लागली त्या दिवसापासून शेतीच्या लुटीचा काळ सुरू झाला. लुटारू, राजे, जमीनदार, सावकार, साम्राज्यवादी गोरे इंग्रज आणि स्वातंत्र्यानंतर काळे इंग्रज अशा वेगवेगळ्या टप्प्यांत शेतकऱ्यांचे शोषण होतच राहिले. इतिहास सारा शेतकऱ्यांच्या शोषणाच्या साधनांचा इतिहास आहे. सरकार तेवढे शेतकरी विरोधीच असते. सरकारी सत्ता हाती घेऊन शेतकऱ्यांचा प्रश्न सुटणार नाही. शेतकऱ्यांची जी पोरे सत्तेत जातात ती शेतकऱ्यांची राहात नाहीत. शेतीच्या अर्थकारणांत आणि एकूणच अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप न करणारी शासनव्यवस्था संघटनेस अभिप्रेत आहे. सरकारकडून सूट-सबसिडी मिळवणे हे संघटनेचे धोरण नाही. शासन नियोजनवादी असेपर्यंत त्यांत जागा मिळवण्याने साध्य काहीच होणार नाही अशी विस्तृत भूमिका सटाणा अधिवेशनातच मांडण्यात आली होती.

शेतकरी हा एक व्यावसायिक वर्ग आहे. केवळ एका वर्गाला घेऊन राजकीय पक्ष तयार होत नाही ही मर्यादाही शेतकरी संघटनेला आहे. मात्र, शेतकरी वर्गाचे समाजातील संख्येच्या दृष्टीने असलेले सामर्थ्यही मोठे आहे. देशातील जवळपास ७५ टक्के लोक ग्रामीण भागत राहातात. या ग्रामीण भागात शेतकरी वर्ग म्हणून निश्चितच प्रभावशाली आहे. पण, दुर्दैवाने निवडणुकीत शेतकरी म्हणून हा वर्ग एकत्र येऊन मतदान करत नाही. जाती, धर्म, वेगवेगळ्या पिकांच्या शेतीत गुंतलेल्या या वर्गाचे



संघटन हे अतिशय कठीण काम आहे. यामुळे देशात सर्वात मोठ्या संख्येने असलेल्या उद्योजक वर्गाचा देशाच्या राजकारणावर काहीही परिणाम होत नव्हता. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या आंदोलनातून निर्माण झालेल्या शक्तीचा उपयोग निवडणुकीच्या वेळी न करणे हेच मूर्खपणाचे ठरले असते. म्हणूनच शेतकरी संघटनेने ही दृष्टी ठेवून १९८२ मध्येच हे सर्व पर्याय वापरण्याचे ठरवले.

सटाण्याच्या अधिवेशनाच्या काळातच शरद जोशींनी एक निवेदन केले आणि ते मोठे गाजले. "शेतीमालाच्या भावाचा प्रश्न कोणाचाही पक्ष सत्तेवर येऊन सुटणार नाही, कोणताही पक्ष सत्तेवर आला तरी शेतकऱ्यांना शेतीमालाचा रास्त भाव मिळतच राहील अशी व्यवस्था उभी करायची आहे. त्यासाठी सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांनी संघटनेत यावे, आपापल्या पक्षांच्या बैठकांत शेतीमालाच्या भावाच्या प्रश्नावर संघटनेची भूमिका परखडपणे आणि चिकाटीने मांडावी, एवढा एक प्रश्न सोडल्यास बाकीच्या कोणत्याही प्रश्नावर आपापल्या पक्षाच्या भूमिकेशी निष्ठा बाळगण्याचे त्यांना स्वातंत्र्य राहील. संघटनेत येतांना आपापल्या पक्षाचे जोडे काढून बाहेर ठेवून त्यांनी प्रवेश करावा. संघटना रामदासांच्या शब्दात राजकारण करते, सत्तेचे राज्यकारण नाही. शेतकरी आंदोलनाला मिळणाऱ्या प्रचंड पाठिंब्याचा उपयोग आपल्या पक्षाच्या विरूद्ध एक दिवस होईल अशी भीती बाळगू नका. शरद जोशीला लोक मानतात कारण त्यांनी शेतकऱ्याचे कुंकू कपाळाला लावले.आहे. या शेतकऱ्यांच्या प्रेमाचा मी कधीही दुरुपयोग करणार नाही. माझ्या वतीने मी वचन देतो की मी 'प्रथम पुरूषी एकवचनी' तुमच्यापुढे मते मागण्यासाठी कधीही येणार नाही, आलो तर मला जोड्याने मारा."

शरद जोशींचे हे निवेदन त्यांचे विरोधक वारंवार वापरतात. आजपर्यंत शरद जोशी स्वतः कोणत्याही निवडणुकीला उभे राहिलेले नाहीत. स्वतःकरिता त्यांनी कधीही मते मागितलेली नाहीत आणि यापुढेही मागण्याचा त्यांचा इरादा असल्याचे दिसत नाही. तरीही संघटनेच्या ग्रामीण भागातील ताकदीने पोटात गोळा उठलेले विरोधक या निवेदनाचा वारंवार उल्लेख करतात. या विरोधकांत दर सहा महिन्यांनी पक्ष बदलून सत्तेच्या मागे धावणारे आहेत. ज्यांचे सार्वजनिक चारित्र्य तपासून पाहण्याच्याही

योग्यतेचे नाही असे लोकही शरद जोशींवर आणि संघटनेवर चिखलफेक करतात.

शरद जोशींचे निवेदन हे त्यांचे व्यक्तिगत निवेदन आहे. सर्व संघटनेस ते कधीही लागू नव्हते. संघटनेच्या उमेदवारांचा प्रचार स्वतः शरद जोशींनी १९८२ साली प्रथमतः निपाणी येथील निवडणुकीत, प्रा. सुभाष जोशी यांच्या समर्थनार्थ केला. त्यानंतर १९८४ आणि ८९ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीत, एवढेच नव्हे तर जिल्हा परिषद आणि साखर कारखानाच्या निवडणुकीतही संघटनेच्या पुरस्कृत उमेदवारांचा त्यांनी प्रचार केला आहे. आघाडीच्या उमेदवारांचा, जनता दलाच्या उमेदवारांचा प्रचार केला आहे. त्यांनी घेतलेले व्रत हे व्यक्तिगत आहे हे स्पष्ट असूनही होणारी ही टीका अगदीच संधीसाधूपणाची आहे. शरद जोशींना नैतिकता शिकवण्याच्या पातळीचा आजतरी कोणी महाराष्ट्रातच काय देशातही नाही.

शरद जोशींच्या या निवेदनाची अवस्था काहीशी पं. नेहरूंनी काश्मीरप्रश्नी सार्वमत घेण्याच्या आश्वासनासारखी झाली आहे. सार्वमत घेतले जावे त्यासाठी पाकिस्तानने हल्लेखोरांचे सैन्य मागे घ्यावे. मतदान करण्यासारखी परिस्थिती तयार करावी अशा पूर्वअटी होत्या त्या न पाळताच सार्वमताचा हट्ट पाकिस्तानी नेते धरतात. शरद जोशींच्या व्यक्तिगत व्रतालाही अशाच पूर्वअटी होत्या. सर्व पक्षाच्या कार्यकर्त्यांनी शेतीमालाच्या रास्त भावाच्या एका प्रश्नावर संघटनेची कास धरावी. आवश्यक तर आपल्या स्वतःच्या राजकीय पक्षाला विरोध करण्याचीही हिम्मत दाखवायची ही पूर्वअट कोणत्याही पक्षाने किंवा पक्षीय कार्यकर्त्याने मानलेली नाही. सर्व पक्षांनी आणि सर्व कार्यकर्त्यांनी शेतकरी संघटनेचा दुस्वास केला आहे. पूर्वअटी संपन्न झाल्या नाहीत. त्यामुळे व्यक्तिगत पातळीवरही स्वतःच्या हाताने घालून घेतलेल्या व्रताचे बंधन पाळण्याची शरद जोशींना नैतिक पातळीवर देखील आवश्यकता नाही.

महाभारत युद्धात प्रत्यक्ष श्रीकृष्णालाही आपले दैवी सामर्थ्य वापरून पांडवांची मदत करावी लागली, वचने मागे घ्यावी लागली. सर्व शेतकरी समाजाच्या आणि देशाच्या भल्याकरितां प्रसंग आला तर शरद जोशींनी मुळात लागू नसलेल्या शपथेचे बंधन पाळू नये अशी त्यांच्या सहकाऱ्यांची इच्छा आहे.



दूध आंदोलन, पंढरपूरचा साकडे मेळावा यांच्या पाठोपाठ १९८४ मध्ये परभणी येथे शेतकरी संघटनेचे दुसरे अधिवेशन झाले. १९८४ हे निवडणुकीचे वर्ष होते. त्या दृष्टीने अधिवेशनात निर्णय झाले. विकेल तेच पिकवा, अन्नधान्ये विकण्यासाठी पिकवू नका, गावातील सर्व भिंती शेतकरी संघटनेच्या घोषणांनी रंगवून काढा, पुढारी आणि कर्जवसुली अधिकाऱ्यांना गावबंदी करा इत्यादी निर्णय या अधिवेशनात झाले. या कार्यक्रमांचे झंझावात गावोगाव सुरू असतानाच सप्टेंबरनंतर महाराष्ट्रभर प्रचारफेऱ्यांचे आयोजन करण्यात आले. या प्रचार फेऱ्यांचा समारोप ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी नाशिक जिल्ह्यात टेहरे येथील प्रचंड शेतकरी मेळाव्याने झाला. पण याच दिवशी पतंप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची हत्या झाली. त्यानंतर देशभर वातावरणात अनपेक्षित बदल झाले. महाराष्ट्रापासून सबंध उत्तर भारतात शीखविरोधी दंगली उसळल्या. देश दहशतवादाच्या भीतीने थिजून गेला. आंदोलनास पोषक असे वातावरण संपुष्टात आले. राजीव गांधी नवे पंतप्रधान झाले. देशभर सत्ताधारी पक्षाला पोषक अशी इंदिरा हत्येनंतरची सहानुभूतीची लाट आली. याचा फायदा मिळून राजीव गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेस पक्षाला प्रचंड बहुमत मिळणार हे स्पष्ट झाले.

या परिस्थितीतच २२ नोव्हेंबर १९८४ मध्ये शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीची बैठक पुणे येथे झाली. सदर बैठकीत सत्ताधारी पक्षाला पाशवी बहुमत मिळाले तर सत्याग्रही आंदोलने निष्प्रभ ठरतील म्हणून या निवडणुकीत काँग्रेसचा पाडाव करू शकणाऱ्या कोणत्याही प्रबळ विरोधी उमेदवाराला पाठिंबा देण्याचा निर्णय शेतकरी संघटनेने घेतला. तथापि, या पाठिंब्याचा निवडणुकीच्या निकालावर फारसा परिणाम झाला नाही. फक्त विरोधी पक्ष कमी मतांनी पराभूत झाले. काँग्रेसच्या मतांत घट झाली. पण सहानुभूतीची लाटच प्रबळ ठरली. सर्व विरोधी पक्षांत समन्वय व तडजोड न झाल्याने विरोधी मतांत फाटाफूट झाली. त्याचाही फायदा काँग्रेस पक्षाला मिळाला. यामुळे काँग्रेसचे बहुसंख्य उमेदवार विजयी झाले. परिणामी, संघटनेला आवश्यक असलेला राजकीय समतोल साधला गेला नाहीच.

या निवडणुकीतील काँग्रेसचा पराभव हे उद्दिष्ट ठेवून सर्वांत प्रबळ

विरोधी उमेदवाराला पाठिंबा देण्याचा निर्णय संघटनेने घेतला. लोकआंदोलनाचे मोठे पाठबळ पाठीशी असतानाही शेतकरी संघटनेने आपले कार्यकर्ते निवडणुकीत उभे केले नाहीत. काही ठिकाणी विरोधी पक्षाचे उमेदवार शेतकरी संघटनेला विरोध करणारेही होते. कम्युनिस्ट पक्षाचे एक उमेदवार तर शरद जोशी सी. आय. ए. चे एजंट आहेत असे म्हणत असत. पण शेतकरी संघटनेने पाठिंब्याचा निर्णय घेतल्यावर सर्व कार्यकर्ते आदेश प्रमाण मानून त्यांच्या प्रचारात पडले. पाठिंबा देत असतानासुद्धा विरोधी पक्षाला पाठिंबा देत असलो तरी ते दोन नंबरचे चोरच आहेत, हे संघटनेने जाहिरपणे मांडले. इंदिरा गांधींच्या हत्येमुळे एक नंबर चोराला पाशवी बहुमत मिळू नये म्हणून दोन नंबरच्या चोराला पाठिंबा देऊन राजकीय समतोल साधणे आवश्यक आहे ही भूमिका संघटनेने मांडली.

राजीव गांधी अपेक्षेप्रमाणे प्रचंड बहुमत घेऊन पंतप्रधान झाले. शेतकरी आंदोलनाच्या दृष्टीने प्रतिकूल वातावरण तयार झाले. मात्र त्यानंतर लगेच महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका लागल्या. निदान महाराष्ट्रात तरी राजकीय समतोल निर्माण व्हावा या दृष्टीने शेतकरी संघटनेने प्रयत्न केले. २१ व २२ जानेवारी ८५ रोजी धुळे येथील अधिवेशनांत काँग्रेससहित सर्व पक्षांच्या नेत्यांना निमंत्रित केले.

या अधिवेशनात सर्व विरोधी पक्ष उपस्थित राहिले होते. पक्षांच्या नेत्यांनी आपली शेतीविषयक भूमिका मांडली. सर्व विरोधी पक्षांनी एक आघाडी करून निवडणुका लढवल्या तरच शेतकरी संघटनेने पाठिंबा देऊ केला. अधिवेशनाच्या व्यासपीठावरून केलेली भाषणे किंवा नंतर चार भिंतींच्या आत झालेल्या चर्चांतून दिलेल्या शाब्दिक आश्वासनांवर विश्वास ठेवण्याचा धोका पत्करू नये इतका भ्रमनिरास सर्वच राजकीय पक्षांच्या बाबतीत शेतकऱ्यांच्या मनात झाला आहे. त्यामुळे विरोधी पक्षीयांच्या एकजुटीच्या स्वीकाराची प्रचिती या पक्षांनी शेतकऱ्यांबरोबर रस्त्यावर आंदोलनात उतरून द्यावी अशी शेतकरी संघटनेने सूचना करून ३ फेब्रुवारी १९८५ रोजी एक तासाचे रास्ता रोको आंदोलन जाहीर केले. या आंदोलनात शेतकऱ्यांच्या बरोबर पक्ष कार्यकर्त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर मोठ्या संख्येने भाग घेतला. त्या काळच्या समाजवादी काँग्रेसचे प्रमुख



म्हणून स्वतः श्री. शरद पवार यांनी ऊरूळी कांचन (जि. पुणे) येथे या आंदोलनात भाग घेऊन अटक करवून घेतली. शेतकरी संघटनेच्या दबावामुळे सर्व विरोधी पक्षाची पुलोद आघाडी श्री. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली झाली. लोकसभा निवडणुकीप्रमाणे विरोधी मतात फाटाफूट टळल्यामुळे लढत चांगली झाली. या दबावामुळे पंतप्रधान राजीव गांधी प्रत्येक सभेत शेतीमालाला रास्त भाव देण्याची घोषणा करू लागले. इतकेच नव्हे तर कृषि मूल्य आयोगाच्या कार्यपद्धतीत बदल करण्याची शेतकरी संघटनेची मागणी लक्षात घेऊन त्याचे नाव बदलण्याची घोषणाही केली. कार्यपद्धतीतही बदल करण्याचे आश्वासन दिले. या विधानसभेच्या निवडणुकीत शेतकरी संघटनेच्या दबावामुळेच विरोधी पक्षांचे ऐक्य शक्य झाले. यामुळे जोरदार लढत होऊन काँग्रेसला विधानसभा निवडणुकीत जेमतेम बहुमत मिळाले. शेतकरी संघटनेच्या या भूमिकेचा काँग्रेसला सर्वात मोठा फटका नाशिक जिल्ह्यात बसून तेथे काँग्रेसच्या सर्वच्या सर्व उमेदवारांचा या निवडणुकीत पराभव झाला. शेतकरी संघटनेला अपेक्षित राजकीय समतोल निदान राज्यात तरी तयार झाला. यामुळेच ऊसउत्पादक परिषद आणि कापसाच्या प्रश्नावरून राजीवस्त्र होळी आंदोलन यशस्वी होण्यासाठी पार्श्वभूमी तयार झाली.

राजीव गांधी पंतप्रधान झाल्यानंतर अपेक्षेप्रमाणे शेतकरीविरोधी धोरणांची अंमलबजावणी जोरात सुरू झाली. जून ८५ मध्ये जाहिर झालेले नवे वस्त्रोद्योग धोरण कापूसशेतकऱ्यांच्या दृष्टीने खूपच जाचक ठरेल असे होते. या धोरणानुसार एका बाजूला कापसाच्या निर्यातीला बंदी तर दुसऱ्या बाजूला कापसाला पर्यायी कृत्रिम धाग्याच्या आयातीला खुला परवाना. यामुळे कापूसउत्पादक शेतकऱ्यांची खुलेआम लूट अटळ झाली. कृत्रिम धाग्याच्या खुल्या आयातीने कापसाच्या मागणीत घट होणार. दुसऱ्या बाजूला निर्यातीला बंदी असल्याने कापसाचे दर पडणे स्वाभाविक झाले. या धोरणाविरूद्ध शेतकरी संघटनेने राजीवस्त्र होळीचे आणि बहिष्काराचे आंदोलन सुरू केले. २ ऑक्टोबर ८५ रोजी वर्धा येथे राजीवस्त्र होळीच्या आंदोलनाला सुरुवात झाली. १२ डिसेंबर ८५ रोजी मुंबई येथे हुतात्मा बाबू गेनू स्मृतिदिनी झालेल्या शेतकरी-कामगार मेळाव्यात या आंदोलनाने परमोच्च बिंदू गाठला. दरम्यान, ६ ऑक्टोबर ८५ रोजी राहुरी येथे

ऊसउत्पादक परिषदही झाली. या परिषदेला विरोधी पक्षाचे नेते सर्वश्री शरद पवार, चरण सिंह, प्रमोद महाजनही हजर होते.

शेतकरी महिला आघाडीचे पहिले अधिवेशन ९, १० नोव्हेंबर ८६ रोजी चांदवड येथे झाले. सुमारे १ लाख स्त्रियांच्या उपस्थितीत जिल्हा परिषद, तालुका पंचायत आणि ग्रामपंचायत यांच्या निवडणुकीत शंभर टक्के महिला उमेदवारांना उभे करण्याचा निर्णय शेतकरी महिला आघाडीने घेतला. तसेच श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर दिल्लीत स्त्रियांच्यावरील झालेल्या अत्याचारांचा निषेध करण्यासाठी पंतप्रधानांच्या घरासमोर निदर्शने करण्याचा निर्णयही घेतला. हे दोन्ही निर्णय राजकीय क्षेत्रात खळबळ माजवणारे ठरले. याचा परिणाम एवढा झाला की भीतीने सर्व निवडणुका बेमुदत पुढे ढकलल्या गेल्या.

यानंतर, राज्यातील शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील प्रमुख विरोधी पक्ष, समाजवादी काँग्रेसने मतदारांचा विश्वासघात करून काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. यामुळे महाराष्ट्रातील विरोधी पक्ष कमकुवत झालेच. पण राजकीय पक्षासंबंधीच्या शेतकऱ्यांच्या अपेक्षाही मातीमोल झाल्या. यामुळे राजकारणात तयार झालेल्या अस्थिरतेत शिवसेनेसारखे जातीयवादी पक्ष वाढू लागले. भाजपने आयोध्येसारख्या प्रश्नाचा आसरा घेतला. कापसाच्या प्रश्नावरून विदर्भमराठवाड्यात झालेल्या विराट शेतकरी आंदोलनात सर्वच विरोधी पक्षांचा सहभाग नगण्य असाच होता. शेवटी, मुंबईत ठिय्या आंदोलनानंतर झालेल्या कराराने या आंदोलनाची यशस्वी सांगता झाली.

८४/८५ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत विरोधी पक्षांच्या उमेदवारांना पाठिंबा देऊन सत्तेत स्वारस्य नसल्याचे शेतकरी संघटनेने दाखवून दिले होते. मार्च ८७ मध्ये नांदेड लोकसभेच्या पोटनिवडणुकीत शेतकरी संघटनेने भारतीय रिपब्लिकन पक्षाचे नेते व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू श्री. प्रकाश आंबेडकर यांना उभे केले. रिपब्लिकन पक्षाचे व शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते एकत्र गावोगाव प्रचारात राहिले. नामांतराच्या विषयावर झालेल्या दंगलीने झालेल्या जखमा भरून काढण्याचे आणि दलित व सवर्णांना आर्थिक प्रश्नावर एकत्र आणण्याचे काम या निवडणुकीने झाले. प्रकाश आंबेडकर पराभूत झाले, तरी दलित व सवर्ण



यांच्यातील दरी कमी करण्यात यामुळे यश मिळाले. निवडणुकीचा उपयोग आंदोलन प्रभावी करण्याकरिता करण्याच्या तत्त्वाचे नांदेड पोटनिवडणूक हे मोठे विधायक उदाहरण.

बोफोर्स तोफा खरेदीत झालेल्या भ्रष्टाचारामुळे केंद्र शासनात प्रथम अर्थमंत्री नंतर संरक्षणमंत्री असलेले विश्वनाथ प्रतापसिंग यांनी सत्तात्याग करून भ्रष्टाचाराविरोधी लढाईचे रणशिंग फुंकले. बोफोर्स प्रकरण आणि व्ही. पी. सिंगाचा सत्तात्याग यामुळे अनपेक्षितपणे देशभर नवे राजकीय समतोल प्रस्थापित होऊ लागले. राजीव गांधींची 'मि. क्लीन' इमेज मलीन झाली. लोकसभेत पाशवी बहुमत असूनही सत्ताधारी पक्ष अस्थिर झाला. याचा फायदा घेऊन शेतकरी संघटनेने ५ सप्टेंबर ८७ रोजी सटाणा येथील विराट शेतकरी मेळाव्याला व्ही. पी. सिंगांना निमंत्रित केले. व्ही. पी. सिंग यांच्या उपस्थितीत या मेळाव्यात ६५ कोटीच्या बोफोर्सच्या भ्रष्टाचारापेक्षा शेतकऱ्यांच्या वर्षाला १२ हजार कोटी रुपयांच्या लुटीचा प्रश्न जास्त महत्त्वाचा आहे, याची जाणीव संघटनेने करून दिली. व्ही. पी. सिंगांनीही शेतकऱ्यांच्या लढाईत खांद्याला खांदा लावून लढण्याचे आश्वासन दिले.

त्यानंतर विदर्भ प्रचार यात्रेचा समारोप नागपूर येथील विराट शेतकरी मेळाव्यात झाला. या मेळाव्याला व्ही. पी. सिंग, अजीत सिंग, अटल बिहारी वाजपेयी, चंद्रशेखर इत्यादी नेते हजर होते. सर्व विरोधी पक्षाच्या नेत्यांना एकत्र करून राष्ट्रीय पर्यायाच्या आवश्यकतेची जाणीव करून देण्याचे काम या मेळाव्याने केले. सर्व विरोधी पक्षनेत्यांनी आपण शेतकऱ्यांच्या बरोबर राहू असे आश्वासन या मेळाव्यात दिले. त्यानंतर 'रिडल्स् इन हिंदुइझम' या आंबेडकरांच्या पुस्तकातील काही मजकुरावरून जातीयवादी संघटनांनी वाद सुरू केला. वसंतदादा पाटलांनी शेतकरी संघटनेला पर्यायी 'राष्ट्रीय शेतकरी संघटना' स्थापन करण्याचा संकल्प सांगली येथील काँग्रेस मेळाव्यात सोडला. १६ जानेवारी ८८ मध्ये शेतकरी संघटनेच्या सांगली येथे झालेल्या विराट शेतकरी मेळाव्याने दोघानाही उत्तर दिले. सर्व जातीयवादी गिधाडांपासून सावध रहाण्याचे आवाहन या तीन लाख शेतकऱ्यांच्या मेळाव्यात शरद जोशी यांनी केले. देशात व राज्यात वाढत चाललेल्या जातीयवादी शक्तींपासून धोक्याचा इशारा सर्वात प्रथम शेतकरी संघटनेने दिला. त्या धोक्याची प्रचिती नंतर सर्व देशाला आलीच.

सटाणा, धुळे, लातूर, नागपूर आणि सांगली येथील विराट शेतकरी मेळाव्यांत व्ही. पी. सिंग यांना आमंत्रित करून त्यांना राष्ट्रीय पर्याय म्हणून देशभर मान्यता मिळण्यास शेतकरी संघटनेने मदत केलीच. शिवाय त्यांना देशातील खऱ्या प्रश्नांकडे लक्ष देण्याचे आवाहनही केले. अशा रीतीने राजकीय समतोल तयार होऊ लागल्यावर शेतकरी संघटनेने जळगावच्या मेळाव्यात कर्जमुक्तीच्या आंदोलनाची घोषणा केली. १८ एप्रिल ८८ रोजी झालेल्या या मेळाव्यात आंबेडकर जयंती व शिवजयंती एकत्रित साजरी करून शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीची घोषणा करण्यात आली. कोर्टात नादारीचे अर्ज दाखल करून कर्जमुक्त होण्यासाठी शेतकरी कायदेशीर मार्गाचा अवलंब करू लागले.

देशात राजकीय समतोल प्रस्थापित झाला तरी भाजपसारखे विरोधी पक्ष रामजन्मभूमीसारखे क्षुद्र वाद उपस्थित करून समाजात कलह निर्माण करू लागले. शिवसेनेसारख्या संघटना गावोगाव जातीयवादाचे विष पेरू लागल्या. अशा परिस्थितीत सर्व समाजजीवन कलुषित, विषारी होण्याची शक्यता निर्माण झाली. अशा शक्तींपासून शेतकऱ्यांनी सावध रहावे म्हणून लोकसभा निवडणुकीच्या काळात शरद जोशी यांनी १२ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबरपर्यंत उपोषण केले. लोकसभा निवडणुकीत शेतकरी संघटनेने प्रामुख्याने सर्व डाव्या लोकशाहीवादी आघाडीच्या उमेदवारांनाही पाठिंबा दिला. तर जेथे विरोधी पक्षात झालेल्या तडजोडीमुळे फक्त जातीयवादी पक्षाचेच उमेदवार विरोधात होते अशा ९ ठिकाणी काँग्रेस पक्षाला पाठिंबा देण्याचा निर्णय शेतकरी संघटनेने केला. या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव करू शकणाऱ्या विरोधी पक्षांना पाठिंबा देण्याचे सूत्र संघटनेने ठेवले. पण त्याचवेळी जातीयवादी शक्ती आणि काँग्रेस यातूनच निवड करण्याची वेळ आली तेव्हा जातीयवादी भस्मासुराच्या विरोधात काँग्रेसलाही पाठिंबा देण्यात संघटनेने गैर मानले नाही. या निवडणुकीत अपक्षेप्रमाणे काँग्रेसचा पराभव झाला. सर्व विरोधी पक्षांच्या पाठिंब्याने पंतप्रधान व्ही. पी. सिंग पंतप्रधान झाले.

किसान समन्वय समितीच्या ३१ डिसेंबर ८९ रोजीच्या बैठकीला पंतप्रधान व्ही. पी. सिंग आणि उपपंतप्रधान देवीलाल हे दोघेही हजर राहिले. या बैठकीत शेतीमालाला रास्त भाव, शेतमजुराला योग्य मजुरी,



शेतकऱ्यांची कर्जमुक्ती आणि निवृत्त जवानांना न्याय्य निवृत्तीवेतन हे चार मुद्दे चर्चेत घेतले. या सर्व प्रश्नांबाबत सरकार शेतकऱ्यांच्या मागण्यांसोबत ठामपणे राहील, असे आश्वासन पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी दिले.

यानंतर, २ जानेवारी ९० पासून जातीयवादी शक्तींच्या विरूद्ध जागृती करण्यासाठी फुले-आंबेडकर विचार पालखीचे आयोजन केले. याचा समारोप २८ जानेवारी ९० रोजी नागपूर येथील मेळाव्याने झाला. या मेळाव्यातही पंतप्रधान श्री. व्ही. पी. सिंग यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचे आश्वासन ठामपणे दिले. कर्जमुक्तीबाबतीत कोणत्याही परिस्थितीत मागे हटणार नाही, असे ठोस आश्वासन त्यांनी दिले. फुले-आंबेडकर विचार पालखीमुळे जातीयवादाविरोधी शक्ती एकत्र येण्यास मदत झाली.

महाराष्ट्रात जातीयवादी शक्तींनी राज्य काबीज करण्याचे प्रयत्न चालवले होते. ९० सालातील विधानसभेची निवडणूक त्या दृष्टीने महत्त्वाची होती. सत्तारूढ काँग्रेस पक्षासंबंधी असलेला असंतोष आणि दुसऱ्या बाजूला विस्कळीत विरोधी पक्ष असे दोनच बिगरजातीयवादी पर्याय समोर होते. जातीयवादी शक्तींनी राज्य शासनाचा ताबा घेऊ नये म्हणून बिगरजातीयवादी विरोधी पक्षांची भक्कम आघाडी देऊन जनतेला नवा पर्याय देण्याचा प्रयत्न शेतकरी संघटनेने केला. इतकेच नव्हे तर, जनता दलाला जेथे प्रबळ उमेदवार मिळाले नाहीत तेथे संघटनेने आपले कार्यकर्ते उमेदवार म्हणून दिले. यामुळे काँग्रेसला बिगरजातीयवादी पर्याय निवडण्यास जनतेला संधी मिळाली. या निवडणुकीत शेतकरी संघटनेचे पाच कार्यकर्ते जनता दलाच्या तिकीटावर निवडून आले. या निवडणुकीत जातीयवादी पक्षांना राज्य काबीज करता आले नाही याचे मोठे श्रेय शेतकरी संघटनेलाच द्यावे लागेल.

त्यानंतर कृषि धोरणासंबंधी अभ्यास करून शासनाला अवहाल देण्यासाठी शरद जोशी यांची 'कृषि सल्लागार समिती' या स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केंद्र सरकारने केली. तथापि पुढे प्रा. मधु दंडवतेंच्या अर्थसंकल्पाने शेतकऱ्यांच्या अपेक्षेवर पाणी फिरवले. अर्थसंकल्पात कर्जमुक्तीला फाटा देऊन फक्त एक संदिग्ध योजना जाहिर केली. याचा फायदा घेऊन अनेक बँकांनी नादारीचे अर्ज दाखल केलेल्या

शेतकऱ्यांना वसुलीसाठी त्रास देण्यास सुरुवात केली. याचा निषेध करण्यासाठी बँक अधिकाऱ्यांना गावबंदी करण्याचा निर्णय शेतकरी संघटनेने घेतला. पण कार्यकर्त्यांना हा कार्यक्रम पुरेसा न वाटल्याने गावोगाव अर्थमंत्री प्रा. मधू दंडवते यांच्या प्रतिमेचे दहन शेतकऱ्यांनी केले. शेतकऱ्यांच्या या असंतोषाची दखल घेऊन पुढे केंद्र सरकारने कर्जमाफीची घोषणा केली.

जुलै ९० मध्ये केंद्र शासनाने कृषि धोरणाचा मसुदा तयार केला होता. यासबंधी सल्ला देण्याची विनंती सल्लागार समितीकडे केली. यावर व्यापक चर्चा होऊनच निर्णय व्हावा, घाईघाईत नको अशी अपेक्षा शरद जोशींनी व्यक्त केली. पर्यायी मसुदा सल्लागार समितीने ऑगस्ट ९० पर्यंत देण्याचे मान्य केले. या मुळे कृषि धोरणासंबंधीच्या कामाला मोठी गती मिळाली. १५ ऑगस्टला लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात व्ही. पी. सिंग यांनी 'किसान दशका'ची घोषणा केली.

दुर्दैवाने याच काळात जनता दलामध्ये अंतर्गत सत्तासंघर्ष उफाळून आला. कृषि धोरणासंबंधीच्या स्थायी समितीच्या अहवालाकडे लक्ष देण्यास पंतप्रधान वेळ देऊ शकले नाहीत. देशातील इतर मागास जातींना खूष करून राजकीय प्रतिस्पर्ध्यांवर मात करण्यासाठी मंडल आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्याची घोषणा पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी केली. मात्र हे डावपेच व्ही. पी. सिंग यांच्यावरच उलटले. यामुळे अन्य शहरी मध्यमवर्गाची सहानुभूती गेली. उलट, मंडल आयोगाच्या शिफारशींविरूद्ध अभूतपूर्व आंदोलन विद्यार्थ्यांनी सुरू केले. शेकडो विद्यार्थ्यांनी त्या विरोधात आत्मदहन केले. व्ही. पी. सिंग यांना पाठिंबा देणारे भाजपसारखे पक्ष बिथरले. त्यांनी मंडल आयोगाच्या खेळीला शह देण्यासाठी रामजन्मभूमीचा प्रश्न पुन्हा उकरून काढला. श्री. लालकृष्ण अडवाणींनी 'राम रथ यात्रा' सुरू केली. देशात जातीय प्रक्षोभ वाढत गेला. सदर यात्रा बिहारमध्ये लालुप्रसाद यादवांनी अडवल्यावर आणि अडवाणी इत्यादी नेत्यांना अटक केल्यावर, भाजपने केंद्र सरकारचा पाठिंबा काढून घेतला. यामुळे व्ही. पी. सिंगांना राजीनामा देणे भाग पडले.

त्यानंतर, चंद्रशेखर व देवीलाल यांचा गट फुटून बाहेर पडला. काँग्रेस पक्षाच्या पाठिंब्याने त्यांनी सरकार स्थापन केले. या नव्या



सरकारच्या काळातही कृषिधोरण सल्लागार समितीचे कामकाज चालले होतेच. तथापि, या संबंधी प्रत्यक्षात सरकारने फारसा उत्साह दाखवला नाही. मंदिर, मंडल आणि राजकीय वादळात याही सरकारचा पाठिंबा काँग्रेस पक्षाने काढून घेतल्याने चंद्रशेखर यांना राजीनामा देणे भाग पडले. राष्ट्रपतींनी त्यांना काळजीवाहू पंतप्रधान म्हणून काम पहाण्यास सांगितले. या काळात कोणतेही धोरणात्मक निर्णय घ्यायचे नाहीत असा संकेत असतानाही स्थायी कृषि सल्लागार समितीचा अहवाल बाजूला ठेवून नोकरशहांकरवी तयार झालेला नवा 'कृषि धोरण मसुदा' 'राष्ट्रीय कृषि धोरण' म्हणून जाहिर केले. असे करून राष्ट्रीय कृषि धोरणामागील संकल्पनेचीच चेष्टा केल्याने स्थायी कृषि सल्लागार समितीने आपण तयार केलेला मसुदा प्रसिद्ध करण्याची अनुमती पंतप्रधानांकडे मागितली. त्यानंतर, शरद जोशी राजकीयदृष्ट्या सोयीचे नाहीत असे दिसल्यावर २५ एप्रिल ९१ रोजी अनपेक्षितरीत्या स्थायी सल्लागार समिती बरखास्त करण्याचा निर्णय घेतला. हे करण्याआधी शरद जोशींशी सल्लामसलतही केली नाही. वास्तविक या समितीची नियुक्ती व्ही. पी. सिंग यांच्या सरकारने केली होती. सदरचे सरकार कोसळल्यावर शरद जोशींनी त्वरीत राजीनामा दिला होता. तथापि नवे पंतप्रधान चंद्रशेखर यांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला नाही. हे काम पुढे चालू ठेवण्याची त्यांनी विनंती केली; पण नंतर अचानक समितीचे काम बरखास्त करण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

१० वर्षाच्या शेतकरी आंदोलनाचे फलस्वरूप म्हणून कृषि सल्लागार समितीची स्थापना झाली. नवे 'राष्ट्रीय कृषि धोरण' तयार झाले. खुल्या अर्थव्यवस्थेत निर्बंधमुक्त शेतीच्या कल्पनेला मूर्त स्वरूप मिळाले. मात्र त्यावर चर्चा होऊन, मान्यता मिळण्याआधीच ते राजकीय वावटळीत सापडले. राजकीय सत्तास्पर्धेतून मंडल, मंदिर यासारख्या अत्यंत क्षुल्लक प्रश्नांना महत्त्व दिले गेले. यातून राजकीय स्वार्थासाठी मंडल आयोगाचा स्वीकार करणारे व्ही. पी. सिंग व जनता दल नामशेष झालेच पण खुर्चीच्या हव्यासाने अल्पकाळ प्रधानमंत्री बनलेले चंद्रशेखरही लोकांच्या मनातून उतरले. याउलट, भाजपसारखे जातीयवादी पक्ष मात्र अधिक बलवान झाले.

पुन्हा एकदा लोकसभेच्या निवडणुका लागल्या. शेतकऱ्यांना कोणत्याच राजकीय पक्षासंबंधी अपेक्षा राहिल्या नव्हत्या. पण विषारी जातीयवादी प्रचाराची तीव्रता कमी करण्यासाठी शेतकरी संघटनेने काही पावले उचलली. जातीयवादी प्रचारामुळे उमेदवारांची निवड रद्द होऊ शकते, हे सिद्ध झाले होते. त्याचा फायदा घेऊन शेतकरी संघटनेने जाहिररित्या अशा प्रचाराचे पुरावे गोळा करून कारवाई करण्याचा निर्णय घेतला. शिवसेनेची मान्यता रद्द करण्यासाठी निवडणूक आयोगाकडे एक याचिकाही शेतकरी संघटनेने दाखल केली. या सर्वांचा परिणाम जातीयवादी प्रचाराची धार कमी होण्यात झालाच; शिवाय, २१ मे ९१ रोजी राजीव गांधी यांची हत्या झाल्याने निवडणुका दोन टप्प्यात विभागल्या. दुसऱ्या टप्प्यातील निकालात काँग्रेस पक्षाला फायदा मिळाला. काँग्रेस पक्ष पुन्हा सत्तेवर आला. पण शेतकरी संघटनेला अपेक्षित राजकीय संतुलनही निर्माण झाले.

श्री. नरसिंह राव नवे पंतप्रधान झाले. त्यावेळी देशाची आर्थिक परिस्थिती अत्यंत डबघईस आली होती. जागतिक वित्त संस्थेची कर्जे घेतल्याशिवाय सरकार चालवणे कठीण होते. पण या वित्तसंस्था देश दिवळाखोरीला आणणाऱ्या नेहरूवादी धोरणात बदल होणार याची खात्री झाल्याशिवाय कर्ज देतील अशी शक्यता नव्हती. त्यामुळे या संस्थांना विश्वास वाटावा म्हणून पंतप्रधानांनी श्री. मनमोहनसिंग या अर्थतज्ज्ञाची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. खुल्या आर्थिक धोरणांचा सरकारने स्वीकार केल्याचे जाहिर केले. इतकेच नव्हे तर, देशातील शेतकऱ्यांनी शेतीमालाची निर्यात करून परकीय चलन मिळवावे आणि देशाला आर्थिक संकटातून सोडवावे असे आवाहन स्वतः पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात केले. या आवाहनाला प्रतिसाद देण्याचा निर्णय शेतकरी संघटनेने घेतला; पण 'सरकारकडून पुन्हा एकदा पाठीत खंजीर खुपसला जाणार नाही आणि कृषिनीतीला अंतिम स्वरूप देण्यासाठी कृषि सल्लागार समितीने तयार केलेल्या 'राष्ट्रीय कृषिनीती'तील परिच्छेद १०५ ते १०७ मध्ये सुचवलेल्या उपाययोजना अंमलात आणण्याचे' वचन सरकारकडून मागितले. (परिशिष्ठ २)

शासनाच्या पुढाकाराची वाट न पहाता शेतकरी संघटनेने चतुरंग



शेतीचा कार्यक्रम शेगाव मेळाव्यात जाहिर करून पुढील वाटचाल सुरू केली. पहिल्याच दोन वर्षात शेतीमालाच्या निर्यातीत भरीव वाढ करून शेतकऱ्यांनी आपला शब्द पाळला. पण शासनाने मात्र तत्कालीन आर्थिक अडचण दूर झाल्यानंतर विश्वासघात केलाच. शेतीमालाची बाजारपेठ नियंत्रित करून दर पाडण्याचे धोरण चालूच ठेवले. त्याचे पहिले ढळढळीत उदाहरण म्हणजे भारतातील गव्हाच्या किंमतीच्या जवळपास दुप्पट किंमत देऊन ३० लाख टन गव्हाची केलेली आयात. दुसऱ्या बाजूला कारखानदारीचे क्षेत्र बहुतांशी खुले झाले तरी शेतीक्षेत्र मात्र नियंत्रितच राहिले. खुलेपणाचा जराही वारा शेतीला लागू दिला नाही.

याच काळात शेतीमालाची बाजारपेठ खुली झाली पाहिजे असे म्हणणारा जनता दल खुल्या अर्थव्यवस्थेच्या विरोधात बोलू लागला. डाव्या पक्षांचा तर खुल्या अर्थव्यवस्थेला विरोध असणे स्वाभाविकच होते. पण भाजपसारखे पक्षही खुल्या अर्थव्यवस्थेला विरोध करू लागले. याच काळात गॅटच्या उरूग्वे फेरीत तयार झालेला अंतिम मसुदा मान्यतेसाठी सर्व देशांसमोर आला. हा मसुदा मान्य झाला तर खुली अर्थव्यवस्था देशात सर्व क्षेत्रास लागू करणे भाग पडेल याची जाणीव सर्व विरोधकांना झाली. म्हणून या प्रस्तावाला मान्यता मिळू नये यासाठी सर्व विरोधी पक्षांनी डंकेल प्रस्तावाविरोधी अपप्रचाराचे काहूर उठवले. त्यातील तरतुदींचा विपर्यास करून सरळ सरळ खोटा प्रचार सर्व मान्यवर विद्वान नेते मंडळी करू लागले. या उलट, सत्ताधारी पक्षाने मात्र मौन धारण केले. कृषिमंत्री बलराम जाखर यांच्यासारखे मंत्री जर-तर च्या भाषेत बोलून विरोधकांना आधारच देऊ लागले.

अशा परिस्थितीमध्ये देशात फक्त शेतकरी संघटनेने ठामपणे डंकेल प्रस्तावाला पाठिंबा देण्याची भूमिका घेतली. डंकेल प्रस्तावातील तरतुदीप्रमाणे शेतीमालाची बाजारपेठ खुली झाली आणि शेतीक्षेत्रात विकसित देशात दिल्या जाणाऱ्या प्रचंड अनुदानात कपात झाली तर भारतीय शेतकऱ्यांना निर्यातीला प्रचंड वाव मिळणार आहे. दुसऱ्या बाजूला भारतातील नियंत्रित अर्थव्यवस्थेत कारखानदारीत तयार झालेल्या वस्तू भरमसाठ किंमतीने शेतकऱ्यांना घ्याव्या लागत होत्या. त्यात खुली स्पर्धा झाल्यानेही शेतकऱ्यांना फायदा होणार होता. बियाण्यांच्या संबंधीही

विरोधकांचा अपप्रचार खोटा असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. डंकेलविरोधी प्रचार फक्त शेतकरी संघटनेने एकाकी लढा देऊन खोडून काढला. शेवटी अपेक्षेप्रमाणे भारत सरकारने गॅट करारावर सही केली.

मात्र, शेतकऱ्यांचे दुर्दैव असे की प्रत्येकवेळी विजयी होऊन पदरी मात्र सहजासहजी काहीच मिळत नाही. पुन्हा संघर्ष करण्याची पाळी येते. वास्तविक, भारत सरकारने खुली अर्थव्यवस्था स्वीकारली, गॅट करारावर सह्या केल्या. आता शेतकऱ्यांना आंदोलनसुद्धा करावे लागू नये. सरकारने शेतकऱ्यांचे सर्वच म्हणणे तत्त्वतः मान्य केले आहे. तरीही आजअखेर देशात खुल्या अर्थव्यवस्थेच्या फायद्यापासून फक्त शेतकरीच वंचित राहिला आहे.

या उलट, देशातील अर्थव्यवस्था खुली करणाची प्रक्रियाही आता जवळपास थांबलीच आहे. नेहरूव्यवस्थेतील बांडगुळांची नाराजी न घेता जेवढे खुले करणे शक्य आहे तेवढे केले. यापुढील बदल बांडगुळांची नाराजी घेतल्याशिवाय करता येणार नाहीत. अर्थव्यवस्था आणखी खुली होऊ नये म्हणून बांडगुळांनी आताच बंड पुकारले आहे. बँक कर्मचारी, सार्वजनिक उद्योगातील कर्मचारी, सरकारी नोकर, सर्वच जण आज खुल्या अर्थव्यवस्थेला विरोध करीत आहे. नेहरू व्यवस्थेतील संरक्षणाला चटावलेले उद्योगपती "लेव्हल प्लेईंग फिल्डची" मागणी करून पुन्हा एकदा संरक्षणाची मागणी करीत आहेत. राजकीय पुढाऱ्यांनाही स्वतःचे कमिशन सांभळण्यासाठी नेहरू व्यवस्थेची चट लागली आहे.

पण याच वेळी खुल्या अर्थव्यवस्थेमध्ये स्पर्धा करून कार्यक्षमता आणि गुणवत्ता सिद्ध करून व्यापार आणि उद्योग करू इच्छिणारा वर्गही देशात तयार झाला आहे. देशातील सर्वभक्षी करव्यवस्थेला आणि नियंत्रणाला त्याचा विरोध आहे. असे उद्योजक आणि शेतकरी यांची एकत्रित आघाडी झाली तर खुल्या अर्थव्यवस्थेला रोखण्याची ताकद कोणत्याही शक्तीत नाही. देशातील शेतकऱ्यांनी सर्व राजकीय पर्याय तपासून पाहिले आहेत. देशातील शेतकऱ्यांना न्याय देईल असा एकही राजकीय पर्याय शिल्लक नाही.

अशा परिस्थितीत असा पर्याय देण्याची जबाबदारी शेतकरी संघटनेवर साहजिकच आली आहे. देशातील, संख्येने सर्वात मोठ्या



असणाऱ्या उद्योजकांचे प्रतिनिधीत्व करणारी शेतकरी संघटना आणि खुल्या अर्थव्यवस्थेचे समर्थन करणारे अन्य उद्योजक, व्यापारी आणि विचारवंत यांच्या संघटनांना एकत्र येऊन असा राजकीय पर्याय निर्माण करणे ही काळाची गरज झाली आहे.

सरकारविरोधी आंदोलनाची कृती करण्यास घाबरणारे व्यापारी, उद्योजक आज संघर्षास सिद्ध होताना दिसत आहेत. जकात कराविरूद्ध किराणा व्यापाऱ्यांनी केलेला प्रदीर्घ संप, तसेच वहातूक व्यवसायातील अडवणुकीबद्दल वाहतूकदारांनी राष्ट्रव्यापी केलेले संप ही त्याचीच उदाहरणे आहेत. तसेच आता महाराष्ट्रात जकात कराविरूद्ध सर्वत्र व्यापारी पुन्हा एकदा संघर्ष करण्याचा पवित्रा घेत आहेत. हे पाहिल्यास आता उद्योजक मुकाट्याने सरकारशाही सहन करण्याच्या मनःस्थितीत नाहीत हे स्पष्ट झाले आहे. जीवनावश्यक वस्तू कायद्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाची लूट होतेच, पण या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी लादलेल्या विविध नियंत्रणांमुळे व्यापारीवर्गही आज त्रस्त झाला आहे. वेगवेगळे कायदे आणि नियंत्रणे यामुळे सर्व उद्योजक जेरीस आले आहेत. केवळ पैसे खाण्यासाठी या नियंत्रणांचा वापर करून वेगवेगळे सरकारी इन्स्पेक्टर आज खुलेआम उद्योजकांची लूट करीत आहेत. अशा परिस्थितीत या सर्व वर्गांनी एकत्र येऊन खऱ्याखुऱ्या खुल्या अर्थव्यवस्थेच्या मागणीसाठी राजकीय पर्याय निर्माण केला तरच देश आर्थिक संकटातून वाचू शकतो.

राजाजींसारख्या द्रष्ट्या नेत्यांनी यापूर्वी स्वतंत्र पक्षाचा पर्याय दिला होता. तथापि ज्या काळात असा पर्याय देण्याचा त्यांनी प्रयत्न केला त्या काळात सारेच समाजवाद व नियंत्रित अर्थव्यवस्थेच्या विचारांनी भारलेले होते. रशियन आणि चिनी क्रांती हेच तरूणांचे व गरिबांचे आदर्श होते. अशा काळातसुद्धा राजाजींनी स्वतंत्र पक्षाची ताकद वाढवली. पण शेतकऱ्यांचा व्यापक पाठिंबा मिळवणे त्यांना जमले नाही. काळाच्या ओघात हा पक्ष निष्प्रभ झाला. मात्र त्यावेळी राजाजींनी म्हटल्याप्रमाणे नियोजित अर्थव्यवस्थेमुळे आज देश देशोधडीला लागला आहे. देशात गुंड, भ्रष्ट नेते आणि नोकर यांचे राज्य झाले आहे. समाजात समाजवादाच्या नावाखाली सक्षमांचे खच्चीकरण व गोरगरिबांचीच पिळवणूक सुरू आहे.

स्वतंत्र पक्षाचे ज्येष्ठ वयोवृद्ध नेते श्री. मिनू मसानी यांनी बदलत्या

परिस्थितीत खुल्या विचारांचे समर्थन करणाऱ्यांना एकत्र येण्याचे आवाहन केले. त्या आवाहानाला प्रतिसाद देऊन मुंबईत भारतीय विद्या भवनाच्या सभागृहात सर्व खुल्या विचाराची माणसं प्रथमच एकत्र आली.

गोरगरिबांचे नाव घेऊन समाजवाद आणणारे आता पूर्ण पराभूत झाले आहेत. खुल्या अर्थव्यवस्थेच्या विरूद्ध समाजवादी बांडगुळांनी उभारलेले बंड मोडून स्वातंत्र्याची मूल्ये जोपासणारी खुली अर्थव्यवस्था देशात निर्माण करणे हेच नव्या पक्षासमोरील ध्येय असेल. या कामात, अर्थातच, गेल्या चाळीस वर्षांत नियोजनआधारित समाजवादी अर्थव्यवस्थेत सर्वात जास्त पिळला गेलेला, लुटला गेलेला शेतकरी वर्गच आघाडीवर असेल.

देशाचा आजार मुळात आर्थिक स्वरूपाचा; नेहरूवादी लायसेंस परमिट इन्स्पेक्टर राज्याचा. पण त्यातून गरिबी, भ्रष्टाचार, महागाई, बेकारी, कर्जबाजारीपणा बोकाळला, इतकेच नव्हे तर गुंड आणि पुढारी यांची युति होऊन राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाले. कायदासुव्यवस्था ढासळून पडली. सत्तासंपादनासाठी धर्माधर्मात, जातीजातीत आग लावून पुढारी आणि पक्ष सरसावून पुढे आले. मूळच्या आर्थिक आजारापेक्षा त्यातून तयार झालेले सामाजिक प्रश्न अधिक भयानक वाटू लागले. या वावटळीत खुल्या व्यवस्थेचे प्रयत्न पालापाचोळ्यासारखे उडून जातील अशी धास्ती वाटू लागली. उंबरठ्यावर आलेल्या निवडणुकांतून काही मार्ग सापडेल अशी आशा नाही. निवडणुकात गुंडाच्या कोणत्या टोळीला मत द्यायचे तेवढेच ठरवण्याचा विकल्प मतदारांच्या हाती राहणार आहे.

परिस्थिती मोठी भयानक आहे. कायदा सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी शासन ताकदवान पाहिजे. पण त्याबरोबरच शासनाने अर्थकारण, शिक्षण, प्रसार, न्यायव्यवस्था यातून सारे अंग काढून घेतले पाहिजे. देशाचे भले व्हायचे असेल तर नेहरूवादी सरकारशाही संपली पाहिजे, नोकरशाहीचा जाच संपला पाहिजे ही सर्वसामान्यांची आकांक्षा. तिचे प्रतिनिधीत्व करणारा पर्याय समोर नाही. हा पर्याय कसा तयार व्हावा, याचे नेतृत्व कोणी करावे? आज कोणी चक्रवर्ती राजगोपालाचारी तरी समोर नाहीत. मुंबईस जमलेल्या खुल्या व्यवस्थेच्या सर्व चाहत्यांनी या कामासाठी शरद जोशींनी पुढे आले पाहिजे असा आग्रह धरला.



"साऱ्या देशात खुल्या व्यवस्थेची निर्भीड मांडणी आणि त्यासाठी पंधरावर्षे केलेला संघर्ष अशी पुण्याई इतर कोणाकडेच नाही. ही जबाबदारी शरद जोशी यांनी स्वीकारली नाही तर तिसरा पर्याय उभाच राहणार नाही." लोकांच्या या मागणीवर शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीत आणि अखिल भारतीय किसान समन्वय समितीच्या बैठकीतही विचार करण्यात आला आणि पर्याय उभा करण्यासाठी शरद जोशी यांना 'स्वतंत्र भारत' पक्षाचे अध्यक्षपद स्वीकारण्याची अनुमती देण्यात आली.

'स्वतंत्र भारत' पक्षाची स्थापना झाली. एकच पर्याय तयार झाला. पण शेतकरी संघटनेने अजून या पक्षासंबंधी आपले धोरण जाहीर केलेले नाही. शेतकरी संघटना अराजनैतिक होती, अराजनैतिक आहे आणि पुढेही अराजनैतिकच राहणार आहे आणि राहिली पाहिजे. 'स्वतंत्र भारत' पक्ष तयार झाला, स्वतः शरद जोशी त्याचे अध्यक्ष झाले म्हणजे शेतकरी संघटना राजकीय बनली असे नाही. संघटनेची 'स्वतंत्र भारत' पक्षाशी कायमची बांधिलकी काही नाही. प्रत्येक निवडणुकीत कोणती रणनीती शेतकरी आंदोलन प्रभावी करण्यासाठी उपयोगी पडेल याचा स्वतंत्रपणे विचार होईल आणि प्रत्येकवेळी स्वतंत्रपणे निर्णय घेतला जाईल.

शेतकरी संघटनेच्या दृष्टीने स्वतंत्र भारत हा एक राजकीय विकल्प आहे. या संबंधाची तुलना संघ आणि भा. ज. पा. किंवा कामगार संघटना आणि कम्युनिस्ट पक्ष यांच्याशी करणेसुद्धा चुकीचे आहे. येत्या निवडणुकात संघटनेची भूमिका काय राहील त्याचा निर्णय १२ नोव्हेंबर १९९४ रोजी नागपूर येथे भरणाऱ्या विशेष अधिवेशनांत होणार आहे.

शेतकरी संघटनेच्या जवळजवळ दीड दशकाच्या आंदोलनांच्या आणि राजकीय भूमिकांच्या इतिहासाचे विहंगमावलोकन जरी केले तरी आर्थिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात तर्कशुद्ध, सुसंगत मांडणी आणि निर्धारपूर्वक अंमलबजावणी याचा प्रत्यय जागोजाग येतो.

संघटनेचे स्वरूप आर्थिक आहे. शेतकऱ्यांचे शोषण सरकारी धोरणाने होते. सरकारी हस्तक्षेप थांबला तर आर्थिक प्रश्न सुटतील व सर्वच समस्यांचे निराकारण होण्यासाठी जमीन तयार होईल. सरकारी धोरणाविरूद्ध उभे राहतांना संघटना अराजनैतिक, अहिंसक आणि असांप्रदायिक भूमिका घेते. महात्मा गांधीप्रणित सत्याग्रहाचे हत्यार

आत्मक्लेशाचे साधन म्हणून मानते. त्या हत्याराला अधिक प्रभावी बनवण्यासाठी शेतीमालाचे अर्थकारण आणि निवडणुकांच्या वेळी सत्तेसाठी धडपडणाऱ्या पक्षांवर दबाव आणण्याची मिळणारी संधी यांचा वापर हे साऱ्या संघटनेच्या इतिहासाचे सूत्र आहे.

निवडणुकांचे आंदोलन प्रभावी करण्यासाठी उपयोग कसा व्हावा, कोणताही एक पक्ष माजू नये, राजकीय पक्षात समतोल राहावा त्याकरिता 'छोट्या चोराला मदत करून मोठ्या चोराविरूद्ध' निवडणुकीत उतरण्याची रणनीति शेतकरी संघटनेने सातत्याने राबविली आहे. छोटा चोर इतका कमजोर की उभे देखील राहू शकत नाही. त्यामुळे संघर्ष मोठा चोर आणि जातीयवादी असा दिसला तेथे तेथे संघटनेने मोठा चोर पत्करला पण जातीयवाद्यांना पाठिंबा दिला नाही.

संघटनेच्या स्थापनेपासून एक दशकभर बदलत्या राजकारणाच्या वावटळीत संघटनेने आपले गलबत हाकारले. यासाठी संघटनेला अधिकाधिक राजकीय हस्तक्षेप करावा लागला आहे. १९८४ साली विरोधी पक्षांवर दबाव आणून पुलोद तयार करण्याचे काम संघटनेने पार पाडले. १९८०-९० साली विश्वनाथ प्रतापसिंगाना पाठिंबा देऊन जनता दलाला उमेदवार पुरवण्यापर्यंत पुढे जाऊन संघटनेने आपले राजकीय उद्दिष्ट साध्य केले.

१९९१ सालापासून सारे जगच बदलले. समाजवादी व्यवस्थेचा जागतिक, ऐतिहासिक पराजय झाला. नेहरूवाद मोडकळीस आला, पाश्चिमात्य जगातही खुल्या व्यवस्थेचे वारे वाहू लागले. राज्यकर्त्या काँग्रेस पक्षाने अडखळत आणि अनिच्छेने का होईना खुल्या व्यवस्थेकडे पावले टाकण्यास सुरुवात केली. त्याबरोबर साऱ्या विरोधकांनी नेहरूवादी व्यवस्थेची भलावणी सुरू केली. जातीयवाद बोकाळला, दंग्याधोप्यांनी देश पछाडला. अशा परिस्थितीत संघटना राजकीय पर्याय शोधत आहे. १९८९ सालच्याही पुढे जाऊन संघटनेने राजकीय पर्याय तयार करण्यासाठी आपला मोहराच 'स्वतंत्र भारत' पक्षाला मदत म्हणून देऊ केला आहे. यापुढचा निर्णय नागपूरच्या अधिवेशनात होईल.

● ● ●



# परिशिष्ट – १

**१. सटाणा अधिवेशन १/२/३ जानेवारी १९८२ (ठराव क्र. ७)**

.... आंदोलनाच्या मागण्या मान्य होईपर्यंत शेतकऱ्यांनी सर्व पुढाऱ्यांना शेतीमालाच्या रास्त भावाच्या प्रश्नावर स्पष्ट भूमिका घेण्याचा ठाम आग्रह धरावा. शेतकऱ्यांच्या या विषयावरील भावनांची शासनास तीव्र जाणीव करून देण्यासाठी हा कार्यक्रम अत्यंत प्रभावीपणे राबवावा.

शेतकरी संघटना ही निवडणुकीच्या राजकारणापासून दूर राहिलेली आहे. संघटनेला शेतकऱ्यांमध्ये जो प्रचंड पाठिंबा आहे, तिचा निवडणुकीवर परिणाम होत नाही याचा गैरफायदा राजकीय पक्ष उठवू पाहत आहेत. शेतकरी आंदोलनाची ताकद वाढविण्यासाठी शेतकरी संघटनेचे निवडणुकांविषयीचे धोरण ठरविण्याचा अधिकार शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते श्री. शरद जोशी, श्री. माधवराव खंडेराव मोरे व श्री. प्रल्हाद कराड पाटील यांना देण्यात येत आहे.

**२. परभणी अधिवेशन १७/१८/१९ फेब्रुवारी १९८४**

**ठराव क्र. (२)**

**राजकीय परिस्थितीचा आढावा**

इंडिया-भारतातील रूंदावणाऱ्या दरीमुळे देशांत गुंडगिरी व भ्रष्टाचार बोकाळला आहे. ग्रामीण भागात पुढारी व शहरात दादा यांचे प्रभुत्व प्रस्थापित झाले आहे. राजकीय सत्तासंस्था ही यांच्याच हातात येत आहेत.

देशातील गरीबी हटत नाही. विकास खुंटला आहे, त्यामुळे क्षुद्रवाद भडकले आहेत. भाषा, जात, धर्म, राज्य यांच्यातील विवाद विकोपास जात आहेत. देश विनाशाकडे झपाट्याने जात आहे. शेतकऱ्यांचे शोषण कायम सुरूच ठेवण्याकरिता देशात हुकुमशाहीची स्थापना होण्याची लक्षणे दिसत आहेत.

सत्ताधारी तसेच विरोधी पक्ष शेतकरी आंदोलनाच्या संघटित ताकदीने आश्चर्यचकित झाले असून संघटनेच्या विचारातील तर्कशुद्धता ते

उघडपणे तरी नाकारू शकत नाहीत.

कोणाताही पक्ष शेतकरीविरोधीच आहे. शेतकऱ्यांना भूलाथापांनी झुलवत ठेवून त्यांची मते मिळवणे व सत्ता हाती ठेवणे एवढाच त्यांचा हेतू आहे.

शेतकरी संघटनेचे शासनाशी असलेले सर्व संबंध संपुष्टात आले आहेत. संघटनेच्या निवेदनांची पोचसुद्धा शासन देत नाही. संघटनेच्या कार्यक्रमांवर बंदी घालणे, शेतकऱ्यांवर खटले घालून त्यांना बेजार करण्याचा प्रयत्न करणे. शेतकऱ्यात भीती निर्माण करणे अशा प्रकारची अंतिम काळची धडपड शासन करीत आहे.

आगामी निवडणुकीत फायदा मिळवण्यासाठी शासकीय सेवकांचे पगार, भत्ते, बोनस वाढविणे, चैन-ऐषारामाच्या वस्तूंच्या किंमती कमी करणे, शेतीमालाच्या किंमती पाडणे अशा कारवाया शासन करीत आहे. सध्याची परिस्थिती राज्यातील शेतकऱ्यांनी निर्धाराने आंदोलन उभे करण्यास अत्यंत अनुकूल आहे.

**ठराव क्र. (४)**

.... आगामी निवडणुकांचा शेतकरी आंदोलन प्रभावी करण्यासाठी योग्य उपयोग करून घेण्याच्या दृष्टीने आवश्यक ते निर्णय योग्यवेळी जाहिर करण्यात येतील.

### ३. सहकारी साखर कारखान्यांतील निवडणुकांसाठी शेतकरी संघटना पॅनेलचा जाहीरनामा (३० एप्रिल १९८४)

१) कारखान्यातील साखरेची रिकवरी पहिल्या वर्षात अर्ध्या टक्क्याने वाढवली जाईल.

२) कारखान्यांवर शासनाने लादलेला बेकायदेशीर खरेदी कर (Purchase Tax) भरण्यात येणार नाही.

३) कारखान्याच्या व्यवस्थापनाची स्वच्छता करून गळिताचा खर्च किमान पातळीवर आणण्यात येईल.

४) लेव्हीची साखर रू. ३५०/- प्रति क्विंटल यापेक्षा कमी भावाने शासनास देणार नाही.

५) खुल्या बाजारपेठेत विकावयाची साखर शेतकऱ्याच्या उसास



कमीतकमी रू. ३००/- प्रतिटन (१० टक्के रिकवरी) भाव मिळेल अशा पद्धतीने विकली जाईल.

६) शेतकऱ्यास योग्य भाव मिळेपर्यंत कोणतीही शासकीय कपात मान्य केली जाणार नाही.

७) ऊसउत्पादक सदस्यांना पाच वर्षांच्या काळात कर्जमुक्त केले जाईल.

हा कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी संचालक मंडळ सर्व कष्ट, त्याग सोसण्यास तयार राहील. संघटनेच्या आंदोलनात संचालक मंडळ बिनीचे सत्याग्रही म्हणून पुढे राहील.

### ४. धुळे अधिवेशन २१/२२ जानेवारी १९८५

शेतकरी संघटनेचे धुळे येथील अधिवेशन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

१) दिनांक ३ फेब्रुवारी १९८५ रोजी दुपारी बारा वाजल्यापासून केवळ एक तासपर्यंत सर्व शेतकरी, मजूर, आदिवासी महाराष्ट्रातील रस्ते रोखण्याचा सत्याग्रह करून अटक करवून घेतील. या सत्याग्रहात शेतकरी प्रश्नाविषयी आस्था असणाऱ्या सर्व व्यक्तींनी उत्साहाने भाग घ्यावा असे आवाहन शेतकरी संघटना करीत आहे. या प्रतिकात्मक आंदोलनाला शासनाकडून योग्य तो प्रतिसाद न मिळाल्यास निर्णायक आंदोलनाचा कार्यक्रम योग्य वेळी ठरवण्यात येईल.

२) आठव्या लोकसभेच्या निवडणुकीत शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी असीम उत्साहाने विरोध उभा ठेवण्याची पराकाष्ठा केली. विरोधकांनी समर्थ पर्याय उभा न केल्यामुळे कार्यकर्त्यांतच नव्हे तर सत्ताधारी पक्षाविरोधी मतदान केलेल्या ५० टक्के मतदारांत वैफल्याची भावना तयार होत आहे. शेतकरी संघटना शेतकऱ्यांतर्फे व लोकशाहीनिष्ठ नागरिकांतर्फे सर्व विरोधी पक्षांना आवाहन करीत आहे की विधानसभा निवडणुकाआधी त्यांनी संयुक्त महाराष्ट्र समिती किंवा पुरोगामी लोकशाही दलासारखी एकसंघ आघाडी एक

नाव, एक नेता, एक कार्यक्रम आणि एक स्वतंत्र चिन्ह या पायावर उभी करावी.

३) शेतकरी संघटना येत्या विधानसभेच्या निवडणुकासंबंधीची आपली भूमिका ३ फेब्रुवारी ८५ च्या आंदोलनानंतर शासनाचा प्रतिसाद आणि विरोधी पक्षांना एकसंघ आघाडी तयार करण्यात आलेले यश विचारात घेऊन जाहीर करील.

### ५. चांदवड महिला अधिवेशन ९/१० नोव्हेंबर १९८६

**राजकीय परिस्थिती**

देशातील सर्व राजकीय व क्षुद्रवादी शक्ती देशाला झपाट्याने विनाशाकडे नेत आहेत आणि पहिले भारतीय गणराज्य बुडण्याच्या वाटेवर आहे. प्रचलित व्यवस्थेचे सर्वात मोठे बळी शेतीवर जगणारे तर आहेतच पण त्याचबरोबर समग्र देशातील स्त्रियाही आहेत. या राजकारणाला पर्याय निर्माण करून विकेंद्रित लोकशाही व्यवस्था तयार करण्याचे सामर्थ्य कोठेच दिसून येत नाही. गावोगाव सत्तास्थाने व आर्थिक संस्था यांच्या आधाराने माजलेल्या गुंड पुढाऱ्यांचे वर्चस्व तयार झाले आहे. त्यातून निर्माण झालेली असुरक्षितता ही स्त्रियांच्या दृष्टीने विशेष हानीकारक आहे.

**ठराव ३.४**

१) हे महिला अधिवेशन जाहीर करते की, ही कोंडी फोडण्याच्या दिशेने पहिले पाऊल म्हणून महाराष्ट्रातील समग्र महिलांनी एकत्र येऊंन जिल्हा पातळीपर्यंतची सत्ता पूर्णपणे हस्तगत करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने येत्या निवडणुकीत महिला उमेदवार उभे करण्यासाठी सर्व महिला संघटनांनी एकत्र यावे अशी विनंती करते.

२) तसेच शेतकरी संघटनेस जि. प. व. पं. स. च्या आगामी निवडणुकांत महिलांच्या या उपक्रमास पाठिंबा देण्याची विनंती करते.



### ६. शेतकरी संघटना, चौथे अधिवेशन, नांदेड, १०/११/१२ मार्च १९८९

शेतकरी महिलांनी पुरूषांच्या बरोबरीने संख्येने व विचाराने ज्यात भाग घेतला ते शेतकरी संघटनेचे चौथे अधिवेशन नांदेड येथे १०/११/१२ मार्च ८९ या काळात पार पडले. चर्चा सगळ्या आर्थिक, राजकीय, सामाजिक विषयांवरच झाल्या आणि महिलांनी त्यात शेतकरी म्हणून भाग घेतला.

**ठराव : २ - पंचायत राज्य व महिला आघाडी**

शेतकरी संघटनेचे हे अधिवेशन

१) जिल्हा परिषदा व पंचायत राज्य समित्यांच्या निवडणुका होऊन ११ वर्षे झाली;

२) १९७९ मध्ये निवडून आलेले लोकप्रतिनिधी दुपटीपेक्षा अधिक काळ त्यांच्या पदांवर राहिले त्यांना तसे राहाण्याचा अधिकार नाही;

३) पंतप्रधानांनी पंचायत राज्याच्या यंत्रणेमध्ये, प्रसंगी घटनादुरूस्ती करून, बदल करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला आहे हे लक्षात घेऊन, मागणी करते की,

१) महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा व तालुका पंचायत समित्यांच्या निवडणुका मे १९८९ च्या आधी घेण्यात याव्या,

२) या निवडणुका होईपर्यंत विद्यमान जिल्हा परिषदा व पंचायत समित्या बरखास्त करून त्यांवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात यावी.

आणि ठराव करते की,

३) या मागण्यांसंबंधी घोषणा एप्रिल १९८९ पर्यंत न झाल्यास शेतकरी संघटना महिला आघाडी आंदोलनाचा कार्यक्रम जाहीर करील;

४) आंदोलनाच्या तयारीसाठी १० एप्रिल १९८९ पासून शेतकरी संघटनेच्या महिला आघाडीची जिल्हावार अधिवेशने घेण्यात येतील.

तसेच ठराव करते की,

५) गावातील ऐक्य अबाधित राहावे यासाठी गावागावातील ग्रामपंचायतींच्या निवडणुका बिनविरोध घडवून आणण्याचा शेतकरी संघटना जास्तीत जास्त प्रयत्न करील.

**ठराव : ७ - सार्वत्रिक निवडणुका : धोरण**

शेतकरी संघटनेचे हे अधिवेशन

१९८९-९० सालातील देशातील राजकीय परिस्थितीचा उपयोग शेतकरी आंदोलन प्रभावी करण्याच्या दृष्टीने व्हावा यासाठी सर्व निर्णय घेण्यासाठी

श्री. रामचंद्रबापू पाटील, माजी अध्यक्ष
श्री. भास्करराव बोरावके, माजी अध्यक्ष
श्री. विजय जावंधिया, अध्यक्ष

या तिघांची समिती नेमीत आहे;

१) स्वातंत्र्यानंतरची सतत ४२ वर्षे सत्तारूढ काँग्रेस (इं) हा पक्ष शेतकऱ्यांचा शत्रू क्रमांक एक राहिला;

२) १९८४/८५ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीतील / निवडणुकीनंतरचे अनुभव आणि

३) विरोधी पक्षीय उमेदवारांसाठी प्रचार करण्यात दमछाक करून घेण्यासाठी कार्यकर्त्यांनी व्यक्त केलेली अनिच्छा लक्षात घेता,

समग्र महिला आघाडीस विनंती करते की या आघाडीने येत्या लोकसभा निवडणुकीतील १००% महिला उमेदवारांनी लढविण्याच्या शक्यतेचा विचार करावा. त्यांनी या निवडणुका १००% लढविण्याचे ठरविल्यास शेतकरी संघटना आपल्या संपूर्ण ताकदीनिशी या आघाडीच्या उमेदवारांच्या पाठीशी उभी राहील.



**७. महिला अधिवेशन अमरावती ८/९/१० नोव्हेंबर १९८९**

**ठराव ४ : पंचायत राज्य संस्थांच्या निवडणुका**

शेतकरी महिला आघाडीचे हे दुसरे अधिवेशन
(अमरावती दि. ८/९/१० नोव्हेंबर १९८९)

चांदवड अधिवेशनात (९/१० नोव्हेंबर १९८६) महाराष्ट्रातील समग्र महिलांनी एकत्र येऊन जिल्हा पातळीपर्यंतची सत्ता पूर्णपणे हस्तगत करण्याचे ठरविल्यापासून महाराष्ट्र राज्य शासनाने पंचायत राज्य संस्थांच्या निवडणुका वेगवेगळ्या मिषाने सतत पुढे ढकलल्या आहेत याचा निषेध करते;

पंतप्रधानांनी चालू वर्षअखेर या निवडणुका घेण्यात येतील असे १९८८ मध्ये दिलेले लेखी आश्वासन पाळले नाही, याबद्दल खेद व्यक्त करते;

निवडणुका पुढे ढकलण्याच्या निषेधार्थ व जिल्हा परिषदा बरखास्त करून त्या जागी प्रशासक नेमण्यात यावेत या मागणीसाठी ज्या महिलांनी जिल्हा परिषद कब्जा आंदोलनात (३ जुलै १९८९) उत्साहाने भाग घेतला त्यांचे अभिनंदन करते; आणि

जेव्हा कधी जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या पुढील निवडणुका होतील त्यावेळी त्या महिला आघाडीतर्फे लढविण्याचा निश्चय जाहीर करते; आणि

या निवडणुकींच्या सर्व कामकाजाची जबाबदारी सौ. विमलताई पाटील, माजी अध्यक्षा, शेतकरी महिला आघाडी यांच्याकडे सोपवीत आहे.

**८. औरंगाबाद कार्यकारिणी बैठक — १०,११ ऑक्टोबर १९९२**

शेतकरी संघटनेने खुल्या अर्थव्यवस्थेसाठी सातत्याने संघर्ष केला आहे. हा लढा नेटाने पुढे चालविण्यासाठी पुढील कार्यक्रम ही कार्यकारिणी जाहिर करीत आहे. .....

खुल्या अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल थंडावू नये यासाठी त्या व्यवस्थेच्या सर्व समर्थकांची एक आघाडी बनविण्यासाठी शेतकरी संघटना पुढाकार घेईल. .....

## ९. सेवाग्राम मेळावा, ३० जानेवारी १९९३

देशातील सध्याच्या परिस्थितीवर थातूर मातूर उपाययोजना करून भागणार नाही. कालहरण केल्याने परिस्थिती आणखी चिघळेल. पहिल्या नेहरूगणराज्याऐवजी एक नवे बळीराज्य देशात एक वर्षाच्या अवधीत आणण्याची हा मेळावा प्रतिज्ञा करीत आहे.

नव्या दुसऱ्या गणराज्यात, बळीराज्यात राजकीय शासन किमान असेल, अर्थव्यवस्था मुक्त असेल, उत्पादक शक्तींना जखडून टाकणारी आणि बांडगुळांना पोसणारी नसेल; दीनदुबळ्यांबद्दल, अपंगांबद्दल करूणेचा ओलावा बाळगेल; न्याय, शिक्षण, प्रसार माध्यमे यांची स्वयत्तता जपणारी असेल.

बळीराज्य देशात उतरवण्याचे काम देशातील नागरिकांनाच करावे लागेल. त्यासाठी सरकारने बळकावलेले सर्व अधिकार काढून घेऊन त्या त्या क्षेत्रातील स्वयंभू संस्था आणि नागरिक यांजकडे पुन्हा सुपूर्त केले पाहिजे.

## १०. किसान समन्वय समिती चंडीगढ, १५, १६, १७ फेब्रुवारी १९९३

### दुसरे गणराज्य

देशातील परिस्थिती कशी सुधारावी हा विचार करण्याआधी देश वाचवायचा कसा यावर भर देणे जरूरी आहे. आज असलेली व्यवस्था रद्द करून ज्यात सरकारचा राजकीय हस्तक्षेप कमीत कमी राहील, व्यापार मुक्त असेल, न्याय, शिक्षण आणि प्रसरमाध्यमे यांच्या व्यवस्था स्वायत्त असतील अशा दुसऱ्या गणराज्याची व्यवस्था उभी करण्याची जरूरी आहे असा निष्कर्ष किसान समन्वय समितीने काढला. त्यासाठी समविचारी व्यक्तींशी, संस्थांशी समन्वय साधण्याचा तसेच या प्रस्तावित व्यवस्थेत बसू शकत नाहीत अशा, सत्तेमध्ये हितसंबंध गुंतलेले भ्रष्ट राजकारणी, बांडगुळ नोकरशाही, संघटित कामगार, मक्तेदार कारखानदार व जातीयवादी या सर्व शक्तींना विरोध करण्याचा ठराव या बैठकीत करण्यात आला.



## ११. बलसाड येथील बैठकीतील निर्णय

### खुल्या बाजाराच्या पुरस्कर्त्यांची आघाडी

किसान समन्वय समितीने आपल्या चंडीगढ बैठकीत (फेब्रु. १९९३) घेतलेल्या निर्णयाप्रमाणे खुल्या अर्थव्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांची विस्तृत पायावर देशव्यापी आघाडी तयार करण्यासाठी झालेल्या प्रयत्नांचा या बैठकीत आढावा घेण्यात आला. येत्या सार्वत्रिक निवडणुकांच्या आधी या देशातील नागरिकांसमोर खुली अर्थव्यवस्था, किमान आणि कार्यक्षम शासन आणि क्षुद्रवादी दडपणांतून मुक्त असा बहुकेंद्री समाज यांसाठी मतदान करण्याचा पर्याय उभा राहील अशी आशा या बैठकीत व्यक्त करण्यात आली.

## १२. औरंगाबाद/महिला आघाडी ३१ ऑक्टोबर १९९३

### ठराव २ : पंचायत राज्य

शेतकरी महिला आघाडीच्या चांदवड अधिवेशनात (९, १० नोव्हेंबर १९८६) सामाजिक, राजकीय परिस्थितीवर सांगोपांग विचार करून विकासकार्याचा मार्ग मोकळा करण्यासाठी तत्कालीन जिल्हा परिषदा बरखास्त करून त्वरीत निवडणुका घेण्याची मागणी करण्यात आली आणि घरसंसार व अनुषंगाने गावगाडा चालविण्याची जबाबदारी असलेल्या स्त्रीच्या दृष्टीकोनातून विकासकामांची आखणी व अंमलबजावणी करता यावी व त्यांत भ्रष्ट, गुंड व सततच्या सत्तेने निर्ढावलेल्या पुढाऱ्यांचा अडसर येऊ नये यासाठी जिल्हा परिषद व पंचायत राज्य निवडणुकांत १०० टक्के महिला उमेदवार उभे करण्याचा ठराव करण्यात आला होता..

नोव्हेंबर १९८९ मध्ये अमरावती येथे झालेल्या शेतकरी महिला आघाडीच्या अधिवेशनाने शासनाला जिल्हा परिषदा बरखास्त करून निवडणुका घेण्याविषयी निर्वाणीचा इशारा दिला.

परिणामी, महाराष्ट्र शासनाने १९९० मध्ये जिल्हा परिषदा बरखास्त करून तेथे प्रशासकांची नियुक्ती केली, आणि पंचायत राज्य संस्थांमध्ये व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ३० टक्के जागा राखीव ठेवण्याचे घोषित केले.

शेतकरी महिला आघाडीने राखीव जागांच्या संकल्पनेला आपली

मान्यता नसल्याचे जाहीर केले. त्यातूनही या राखीव जागा ज्या पद्धतीने निश्चित करण्याचे ठरवले त्यामुळे राखीव झालेल्या मतदार संघ पुढील निवडणुकीच्या काळात बिनराखीव होणार. परिणामी, निवडून आलेल्या प्रतिनिधीला आपल्या कारकीर्दीत केलेल्या कामाचा लाभ पुढील निवडणुकीसाठी मिळणार नाही; परिणामी, त्यांच्यात काम करण्याची उमेद राहणार नाही;

- कार्यक्षम कार्यकर्तीला शेजारच्या अन्य राखीव मतदारसंघातून निवडणूक लढवून यश मिळवणे शक्य असणार नाही;
- जागा निश्चित करण्याच्या या रोस्टर पद्धतीमुळे, ७०% पुरूष उमेदवारांपैकी निम्म्या उमेदवारांच्या जागा पुढील निवडणुकीत राखीव होणार असल्याने आणि त्याही नेमक्या कोणत्या हे निश्चित नसल्याने त्यांच्यातही काम करण्याची उमेद राहणार नाही.
- ७०% मतदारांना महिला उमेदवारांना मत द्यायची संधी मिळणार नाही.

यामुळे होतकरू महिला कार्यकर्त्या आणि कार्यकर्तेही या निवडणुकांबाबत उदासीन राहातील आणि

या उदासीनतेचा लाभ घेऊन टगे पुढारी बिनराखीव जागांवर स्वतः उभे राहातील आणि राखीव जागांवर आपल्या नातेवाईक महिलांना उभे करतील.

या सर्व गोष्टींमुळे महिला चळवळीचे आणि पंचायत राज्याचेही नुकसान होईल हे लक्षात घेऊन शेतकरी महिला आघाडीने पर्याय सुचविला की,

एक जिल्हा परिषद मतदार संघ व त्या अंतर्गत येणारे दोन पंचायत समिती मतदार संघ यांचे एक मंडल बनवून या तीनपैकी एक जागा क्रमाक्रमाने राखीव ठेवावी व या मंडलातील सर्व मतदारांना तीन मते देण्याचा अधिकार असावा.

पण शासनाने शेतकरी महिला आघाडीच्या सूचनेकडे अजिबात लक्ष दिले नाही.

हे शेतकरी महिला अधिवेशन, औरंगाबाद, ३१ ऑक्टोबर १९९३



महिलांना पंचायत राज्य संस्थांमध्ये सहभागी होणे आवश्यक व महत्त्वाचे आणि समाजाच्या खऱ्या विकासाच्या दृष्टीने उपयुक्त मानते

आणि ठराव करते की,

शेतकरी महिला आघाडी भीकसदृश अशा राखीव जागेच्या संकल्पनेचा निषेध करते, त्या जागा निश्चित करण्याच्या, महिलांच्या गुणात्मक सहभागाची शक्यता दूर ठेवणाऱ्या पद्धतीला विरोध करते आणि

पंचायत राज्याच्या सर्व निवडणुकांत राखीव जागांसह बिनराखीव जागांपैकी जितक्या शक्य होतील तितक्या जागी उमेदवार उभे करील.

## १३. शेतकरी संघटना पाचवे अधिवेशन, औरंगाबाद, २९,३०,३१ ऑक्टोबर १९९३

### ठराव : ३ — बळीराज्याचे स्वागत

खऱ्या अर्थाने स्वतंत्र आणि मुक्त समाज निर्माण करण्याचा निर्धार व्यक्त करते,

आणि त्यासाठी देशातील सर्व उद्योजकांना खुल्या व्यवस्थेच्या स्वागतासाठी सज्ज होण्याचे आवाहन करते;

सरकारी मेहेरबानीवर पुष्ट झालेले उद्योजक, नोकरदार व पुढारी यांचे प्रयत्न हाणून पाडण्याकरिता सर्व उद्योजकांनी 'ऐतखाऊं'विरुद्ध आघाडी उभारण्याचे आवाहन करते;

ही आघाडी यशस्वी करण्याकरिता आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय इत्यादी सर्व क्षेत्रांत उद्योजकांनी मोर्चेबांधणी करावी असेही आवाहन करते.

## १४. कार्यकारिणी बैठक, अकोला, १९९४

### राजकीय भूमिकेवर निर्णय :

कार्यकारिणीच्या या बैठकीत शेतकरी संघटनेच्या राजकीय समितीने औरंगाबाद अधिवेशनापासून केलेल्या विचारविनिमयाचा व कार्यक्रमांचा आढावा घेण्यात आला. तसेच, खुल्या अर्थव्यवस्थेने प्राप्त झालेल्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी वेगळा राजकीय पर्याय उभा करण्याच्या आवश्यकतेवर चर्चा करण्यात येऊन ठराव करण्यात आला की,

दि. २८ मे १९९४ रोजी शेतकरी संघटनेच्या राजकीय समितीच्या पुढाकाराने मुंबई येथे, स्वातंत्र्यावर श्रद्धा असणाऱ्या, स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी कटिबद्ध होऊ इच्छिणाऱ्या देशभरातील कार्यकर्ते व विचारवंत यांच्या भरणाऱ्या परिषदेत शेतकरी संघटनेच्या वतीने भूमिका मांडण्याचे व निर्णय घेण्याचे सर्व अधिकार शरद जोशी यांना देण्यात येत आहे.

### १५. किसान समन्वय समिती बैठक, सेवाग्राम वर्धा
### राजकीय पर्याय

किसान समन्वय समिति ने देश के राजकीय स्थिती का विस्तार से जायजा लिया । प्रमुखतः, स्वतंत्रता में विश्वास रखनेवाले नागरिकों के सामने चुनने लायक पर्याय कोई बचा नहीं इसपर गहरी चिंता प्रकट करते हुए किसान समन्वय समिति ने हर व्यक्ति की स्वतंत्रता की रक्षा के लिए अलग राजकीय पर्याय की आवश्यकता महसूस की और मुंबई में स्थापित 'स्वतंत्रता आंदोलन' ने इस तरह का पर्याय सामने लाने जो प्रयास शुरू किये हैं उनका स्वागत किया ।

यह प्रस्ताव करते समय किसान समन्य समिति ने यह भी जाहिर किया कि यह समिति भविष्य में भी पहले की तरह देश के किसान आंदोलन की ही संस्था रहेगी, वह राजकीय पार्टी में नहीं बदलेगी ।

● ● ●



# परिशिष्ट – २

**शेतीमालाची निर्यात**

१०५. शेतीमालाच्या निर्यातीच्या परवान्यांबाबत एकापाठोपाठ एक आलेल्या सरकारांचे धोरण अत्यंत अनिश्चित राहिले असले तरी गेली अनेक वर्षे भारताने, मुख्यतः प्राथमिक शेतीउत्पादनांची निर्यात केली आहे आणि आजही करीत आहे. शेतीमालाच्या निर्यातीवर चार घटकांचा विपरित परिणाम झाला आहे.

– निर्यात करायची असेल तर त्यासाठी मालाची निर्यातक्षम बचत (Surplus) झालेली असली पाहिजे असे मानले गेले. त्यामुळे, एखाद्या वर्षी देशी बाजारपेठेत मालाचा तुटवडा निर्माण झाल्याने शासनाने त्या मालावर निर्यातबंदी लावली आणि अनेक वर्षे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मिळविलेले आणि टिकवून ठेवलेले स्थान भारताला गमवावे लागले, अशी अनेक उदाहरणे घडल्याचे दिसून येते. या कारणाने भारत आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील आपली विश्वासार्हता गमावून बसला आहे.
– वर्धितमूल्य (Value added) वस्तूंची निर्यात ही कच्च्या मालाच्या निर्यातीशी स्पर्धा करणारी समजून चालता नये. दोन्हींच्या निर्यातीचे एकत्रित व्यवस्थापन अशा रीतीने केले पाहिजे की त्या वस्तूंच्या देशी बाजारपेठेतील किंमती रास्त किंमतमर्यादापट्टीच्या बाहेर जाणार नाहीत.
– त्या पलिकडे, शेतीमालाचे देशी बाजारपेठेतील भाव खालच्या पातळीवरच राहावेत या उद्देशाने हितसंबंधी कारखानदारी गट शेतीमालाची निर्यात कमीत कमी व्हावी यासाठी सतत प्रयत्नशील असतात.
– किमान निर्यातकिंमतीच्या व्यवस्थेची कार्यप्रणाली भारतीय शेती-व्यवसायाच्या वास्तवतेशी न जुळणारी आहे.

१०६. निर्यात हे शेतीउत्पादनाच्या महत्त्वाच्या उद्दिष्टांपैकी एक मानले गेले पाहिजे. प्रत्येक निर्यातक्षम मालासंबंधी निर्यात धोरण पुरेशी सवड देऊन – किमान तीन वर्षे आधी घोषित झाले पाहिजे. देशी बाजारपेठेतील पुरवठापरिस्थिती काहीही असली तरी काही ठराविक परिमाणाच्या मालाच्या निर्यातीची हमी घेतली पाहिजे. एखाद्या वर्षी जर देशी बाजारामध्ये, मालाचा तुटवडा भासू लागला तर त्या मालावर निर्यातबंदी घालण्याऐवजी त्याची आयात करून तो तुटवडा भरून काढता येऊ शकेल.

१०७. शेतीमालांच्या उत्पादनांस परकीय चलन विनिमयाचा घटक अत्यंत अल्प असतो हे लक्षात घेता, औद्योगिक उत्पादनांना जी निर्यातअनुदाने दिली जातात त्यापेक्षा बरीच चढी अनुदाने शेतीमालाला देऊन शेतीमालाच्या निर्यातीला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. शेतीव्यवसायासाठी लागणाऱ्या अवजारांच्या आणि सामुग्रीच्या आयातीची पद्धती अगदी सुकर केली पाहिजे आणि त्यांच्या आयातीवरील जकातकरांतही सवलत दिली पाहिजे.

राष्ट्रीय कृषिनीती
प्रकाशन : नोव्हेंबर १९९१